
# कोरोना : गुलामगिरीचे नवे पर्व
# टाळेबंदी : पर्यावरण रक्षणाचा नवा मार्ग

संजय टाकळगव्हाणकर





# कोरोना : गुलामगिरीचे नवे पर्व
# टाळेबंदी : पर्यावरण रक्षणाचा नवा मार्ग

संजय टाकळगव्हाणकर

पवन प्रकाशन, परभणी

Corona : Gulamgiriche Nave Parva
Talebandi : Prayawarn Rakshanach Nava Marg
by : Sanjay Takalgavankar

**कोरोना :** गुलामगिरीचे नवे पर्व; **टाळेबंदी :** पर्यावरण रक्षणाचा नवा मार्ग
**लेखक :** संजय टाकळगव्हाणकर


**सर्व हक्क :** लेखकाधीन

**लेखकाचा पत्ता :**
प्रयाग, नवा मोंढा, हिंगोली.
मो. ९८२२७३४२८१ Email : tasanjay201@gmail.com

**प्रथमावृत्ती :** जानेवारी २०२१

**प्रकाशन दिनांक :** २४ जानेवारी २०२१

**मुखपृष्ठ व आतील रेखाटणे :**
दिलीप दारव्हेकर, आखाडा बाळापूर.
मो. ८६६८५५२१७९
**अक्षर जुळणी :**
गोविंदा डिझायनर्स ॲण्ड प्रिंटर्स, परभणी.
मो. ९९२१८६९३९२
**प्रकाशक :**
पवन प्रकाशन,
तारांगण, हेडगेवार मार्ग, परताणी हॉस्पिटल समोर,
न्यू डॉक्टर लेन, परभणी.
मो. ९४२२१७९४६१
**मुद्रक :** स्नेहल प्रिंटींग प्रेस, पुणे
**किंमत :** रु. ७०/-



# करोना: गुलामगिरीचे नवे पर्व –

# लेखक- संजय टाकळगव्हाणकर

हे पुस्तक ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना ई स्वरुपात विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठान लेखक श्री संजय टाकळगव्हाणकर यांचे आभारी आहे.

या पुस्तकाचे ई प्रकाशन करण्यास परवानगी दिल्याबद्दल आम्ही पवन प्रकाशन, परभणी यांचे आभारी आहोत.

या पुस्तकावरील प्रतिक्रिया आपण श्री संजय टाकळगव्हाणकर यांना 9822734281 या क्रमांकावर कळवू शकता.

धन्यवाद

सुनीळ सामंत

टीम ई साहित्य

esahity@gmail.com

www.esahity.com

Whatsapp: 99877 37237

# मनोगत

कोविड–१९ म्हणजेच कोरोना जागतिक संसर्ग, मानवी जातीवर अभुतपूर्व संकट या जागतिक संकटामुळे मानव जातीचे अस्तित्व नष्ट होईल की काय? या भीतीने जगातील सर्व देशभरातील सत्ताधिकारी (शासन) हे खडबडून जागे जाले. जगाच्या इतिहासात कधी नव्हे इतके मानवी प्रेम या कोरोना निमित्ताने त्या त्या देशातील शासन व्यवस्थेत उन्मळून आले. शुद्ध पाणी, हवा, अन्न व औषध उपचाराविना व इतर मूलभूत सुविधांविना यापुर्वीही जगात लाखो लोक मृत्युमुखी पडले. याबाबत जागतिक स्तरावर कधीच मानवी जीवनाबद्दल संवेदना एवढ्या मोठ्या प्रमाणावर जाग्या झाल्या नव्हत्या व नाहीत. पण अचानक जागतिक स्तरावर या कोरोना संसर्गाबाबत एक समान उपाययोजना त्या त्या देशातील शासनकर्त्यांनी व त्या अनुषंगाने प्रसारमाध्यमे, सोशल मीडिया व अन्य प्रसिद्धीमाध्यमांनी मानवी जातीच्या रक्षणासाठी केलेली जनजागृती ह्या बाबीकडे सुक्ष्म नजरेतून पाहिले असता व यापूर्वी जगात आलेल्या संसर्गरोगा बाबत करण्यात आलेल्या उपाय योजनांकडे दृष्टीक्षेप टाकले असता व ज्येष्ठांचे या सर्व रोगा बाबतचे अनुभव पाहता खरोखरच कोरोना हे मानवी अस्तित्वास कधी नव्हे इतके मोठे आव्हान ठरले आहे का? याबाबत एक विज्ञानवादी मनुष्याला प्रश्न पडणे सहाजिकचं आहे. त्यातून कोविड–१९, लॉक डाऊन (टाळेबंदी) यावर अभ्यास व चिंतन सुरू झाले.

माझी आई प्रयागबाई हिने स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून प्लेग, कॉलरा व इतर संसर्गजन्य रोगा बरोबरच अनेक रोगाच्या साथी पाहिल्या. तिने सांगितल्याप्रमाणे १९५७ या वर्षात मोठ्या प्रमाणात ६० वर्षे वयापेक्षा वयस्क वृद्धांच्या मृत्यूंचे प्रमाण मराठवाड्यात जास्त प्रमाणात होते. यादरम्यान वयस्कांचे मृत्यूचे कारण तत्कालीन आजार होते पण ती विशिष्ट रोगाची साथ नव्हती, या बाबत शासन स्तरावर माहिती उपलब्ध असल्याचे पहावयास मिळत नाही. मग आईच्या सांगण्यावरून जिज्ञासा वाटली व मी अभ्यासाला सुरूवात केली. या कोविड–१९ रोगाच्या अल्पावधीतच संक्रमीत लोकांच्या मृत्यूचे आभासी मोठे प्रमाण व त्यावर प्रतिबंध उपाय म्हणून दीर्घकालीन टाळेबंदी हा एकूणच प्रकार अनाकलनीय वाटला. आणि पुढे आईच्या चर्चेतून मला प्रेरणा मिळाली, त्यातून टाळेबंदी दरम्यान मानवी शरीराच्या संचारास मर्यादा आली असली तरी बुद्धीच्या विचारास मात्र गती मिळाली. अभ्यास व चिंतनाबरोबर डॉ. बिश्वरूपराय चौधरी यांच्या अभ्यासपूर्ण प्रसारणाच्या व सोशल मीडिया वरील विवेचनाच्या आधारावर कोविड–१९ व टाळेबंदी यावर लेखमाला लिहिली. परंतु शासन, प्रसारमाध्यमे यांनी कोरोना संदर्भात जागतिक संकट इतके मोठे उभे केले की त्यांच्या विरोधात एक शब्दही लिहिणे राष्ट्रद्रोह व मानवद्रोह ठरेल की काय? असे भय संपूर्ण जगात निर्माण करण्यात आले, असे असताना हि लेखमाला कोण प्रसिद्ध करेल ही साशंकता मनात होती. तरीपण विज्ञानाचे शोध हे बहुमताच्या व प्रस्थापित व्यवस्थेचा विचार न करता ते मानवी कल्याणासाठी त्या–त्याकाळातील वैज्ञानिकांनी लावलेले आहेत. विचारवंतानी आपल्या लिखाणातून प्रस्थापित व्यवस्थेची तमा न बाळगता वैचारिक क्रांतीतून वैज्ञानिक, राजकीय, सामाजिक, परिवर्तन घडवून आणले. सॉक्रेटिस व गॅलिलिओ हे आमचे आदर्श आहेत, त्यामुळे विषाचा प्याला घेण्याची वेळ येवो अथवा मृत्यूदंडाची शिक्षा होवो यावर निरपेक्ष सदसद्विवेकबुद्धी जागी ठेवून लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

महाराष्ट्रातील दै.कृषीवल हे वृत्तपत्र परिर्वतर्नवादी, शोषित, शेतकरी, कष्टकऱ्यांचे पाच दशकापेक्षा अधिक काळापासून महात्मा फुले यांना अभिप्रेत असणारे, सामाजिक परिर्वतन व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अति उच्च मानवी मूल्यांचे व संविधानाचे रक्षण करण्यासाठी आजही रायगडात उभे आहे. कृषीवल दैनिकाच्या व्यवस्थापकीय संचालिका माननीय चित्रलेखा पाटील व संपादक प्रसाद केरकर यांनी ही लेखमाला प्रसिद्ध करण्याचे धाडस केले यासाठी त्यांचा मी प्रथम कृतज्ञ आहे. याशिवाय विदर्भातील शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी प्रहार करणारे दै. देशोन्नतीचे संपादक माननीय प्रकाश पोहरे, मराठवाड्यातील दै.लोकपत्र संपादक माननीय कमलकिशोर कदम, कार्यकारी संपादक माननीय रवींद्र तहकीक यांच्या सहकार्यातून ही लेखमाला ११ एप्रिल ते १५ ऑगस्ट २०२० या कालावधीत प्रसिद्ध झाली. ह्या लेखमालाचे एकत्रित लेख **कोरोना : गुलामगिरीचे नवे पर्व, टाळेबंदी : पर्यावरण रक्षणाचा नवा मार्ग** हे पुस्तक रुपात आणले आहे. कोरोना व टाळेबंदी यांचे मानव जातीवर, पर्यावरण व सजीव सृष्टीवर चांगले व वाईट होणारे परिणाम हे माझ्या बुद्धीला जे पटले ते मी मांडले आहेत. परंतु सध्याच्या एकंदरीत परिस्थितीत समाजातील लेखक व विचारवंतांची लेखनाची बोथट होत चाललेली धार व व्यवसायिक प्रवृत्ती ही अत्यंत चिंतनीय बाब आहे. औद्योगिक क्रांतीनंतर यंत्रातून निर्माण होणारा माल व मालासाठी बाजारपेठ त्यासाठी लागणारा कच्चा माल यातून जगात विस्तारासाठी युरोपियन भांडवलदार, राज्यकर्त्यांनी जगातील मानव व पर्यावरणाचे युद्धाच्या माध्यमातून शोषण केले. शस्त्र–विज्ञान तंत्रज्ञानाच्या क्रांतीतून मानवावर गुलामगिरी लादली युद्धाबाबत जगात वाढणारा असंतोष व युद्ध ही नपरवडणारी बाब भांडवली महासत्तांना समजल्यानंतर शीतयुद्धानंतर (तिसरे महायुद्ध) बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आता आरोग्याच्या माध्यमातून जैविक युद्ध छेडले आहे.

हे युद्ध आधीच्या युद्धापेक्षा भांडवली सत्ताधिकाऱ्यांचे नव्या गुलामगिरीत अडकविण्याचे हे षडयंत्र आहे. कोरोना प्रादुर्भावाच्या काळाच्या पुर्वी संबंधित जग या प्रदूषणाच्या विळख्यात अडकले असतानाच कोरोना साथीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करण्यात अलेली टाळेबंदी ही भलेही मानव जातीच्या रक्षणासाठी गृहीत धरून केलेली असली तरी ह्या टाळेबंदी मुळे पर्यावरणाच्या तत्कालीन परिस्थितीत व आजच्या जागतिक पर्यावरण स्थितीत लक्षणीय फरक झालेला दिसून येतो. खनिज तेल, नैसर्गिक साधन संपत्तीत झालेला बचाव, थांबलेले अपघात, कौटुंबिक स्वास्थ्य व मानवी स्वास्थ्य या गोष्टी अन अपेक्षित पणे मानवी पदरात पडल्या आहेत असेही वाटते.

प्रस्तुत पुस्तकात जागतिक भांडवली अर्थव्यवस्थेने मानवी गुलामीची कास कशी बळकट केली आहे. हे व्यक्त केले आहे. स्वदेशी, आत्मनिर्भरता, एकसंघ बलशाली राष्ट्र ही राज्यकर्त्यांची घोषणा कशी तकलादू आहे. हे सांगण्याचा इथे प्रयत्न केला आहे. म. भगवान महावीर, म. गौतम बुद्ध ते म. गांधी यांचे अहिंसावादी विचार प्रत्यक्ष सार्वजनिक जीवनात अंगीकारले तरच भारत जगाचे नेतृत्व करेल. राजकीय घोषणा फक्त सत्ताप्राप्तीसाठी नसल्या पाहीजेत तर त्या देश, राष्ट्रहीतासाठी असल्या पाहिजेत. छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या सारख्या लोकराजांनी त्यागवृत्ती जोपासून सत्यात उतरविल्या आणि तेच खरे राष्ट्रवादाचे प्रतीक आहेत, म्हणून देश राष्ट्र डोळ्यासमोर ठेवून कुठल्याही परिणामाची तमा न बाळगता टाळेबंदीतील चिंतन आपल्या समोर ठेवत आहे. केवळ सृष्टी व मनुष्य यांचे हित हेचं या पुस्तकाचा गाभा आहे. सदर लेखमाला पुर्ण करण्यासाठी गुरूवर्य प्रा.ए.डी.शिंदे, गुरूवर्य भ.मा. परसावळे, प्रा. विलास वैद्य यांचे मार्गदर्शन लाभले आहे.



आमचे सहकारी गंगाप्रसाद भिसे, विठ्ठल सोळंके यांचे मोलाचे सहकार्य लाभले, टाळेबंदीच्या भयग्रस्त वातावरणातही माझी पत्नी सौ. अरुणा टाकळगव्हाणकर यांची साथ लाभली. तसेच आमचे वृत्तपत्र क्षेत्रातील परम मित्र डॉ. विलास ढवळे, रमेश चित्ते व साईनाथ बोराळकर यांचेही सहकार्य लाभले, यातून या पुस्तकाच्या निर्मितीस अधिक पाठबळ मिळाले. तसेच या पुस्तकाच्या प्रकाशनाची जवाबदारी प्राचार्य पवन सोळंके यांनी त्यांच्या पवन प्रकाशनातून पार पाडली. या कामी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे मदत करणारे सर्व सहकारी, गुरूवर्य व मित्र यांचा मी शतश: ऋणी आहे... जय हिंद!!

**– संजय टाकळगव्हाणकर**



## प्रस्तावना

# मानवी गुलामगिरीचे साक्षेपी चिंतन नि स्वशोधनाची जाणीव करून देणारे पुस्तक

संजय टाकळगव्हाणकर हे सव्यासाची पत्रकार आहेत. सामाजिक जाणीव प्रगल्भ असणारा आणि समता, बंधुता न्यायाच्या भूमिकेत सतत वावरणारा एक चिंतक म्हणून संजय टाकळगव्हाणकर यांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे.

प्रारंभी आम्ही दोघेही नांदेड येथील दैनिक लोकपत्रमध्ये संपादकीय विभागात काम करीत होतो. तेव्हापासून संजयची धडपड मी पाहात आलो आहे. लोकशाही मूल्ये, सामाजिक समानतेची प्रस्थापना, आणि आहे रे - नाही रे वर्ग संघर्ष या अभ्यासवर्तुळात त्यांची मांडणी उत्तम राहिली आहे. पत्रकार म्हणून आणि नंतर एक शिक्षक म्हणून या दोन्ही भूमिकांमध्ये वावरताना वैयक्तिक पातळीवर, समुह पातळीवर त्यांनी उभे केलेले लढे मी पाहिले आहेत. शैक्षणिक संस्थाचालकांची मुजोरी, संस्थेत काम करणारे शिक्षक, कर्मचारी यांची होणारी ससेहोलपट, छळ या विषयांवर पीडितांना एकत्र करून प्रशासनिक व न्यायिक पातळीवर त्यांनी लढे दिले. सतत संघर्षशील राहताना लोककल्याण हा उदात्त हेतू त्यांनी नजरेसमोर ठेवला आहे.

एक सच्चा माणूस कसा असावा याचे जिवंत उदाहरण म्हणजे संजय टाकळगव्हाणकर आहेत. गेली तीन दशके त्यांचा हा समाजाभिमुख प्रवास मी डोळसपणे पाहिला आहे. म्हणून त्यांच्या लेखनाबद्दल मत व्यक्त करताना, त्यांच्या व्यक्तित्त्वाला उलगडून दाखवणे आवश्यक वाटते. इतिहास, भारतीय समाजव्यवस्था, आंतरराष्ट्रीय राजकारण हे त्यांचे अभ्यास विषय राहिलेले आहेत. भारतीय समाजव्यवस्था, परंपरागत चातुर्वर्ण्य, परंपरावाद यातून समाजाचे झालेले अध:पतन त्यांनी गडदपणे मांडले आहे. जागतिक परिप्रेक्ष्यात ही मांडणी करताना भारतीय व्यवस्थेचे एकेक पदर उलगडून दाखवताना दिसतात.

कोरोनाकाळ आणि भयप्रदता सद्यस्थितीत कोरोना जागतिक महामारीनं सारं जग कुंठित केलं आहे. सारे व्यवहार ठप्प झाले. दळणवळण थांबले. लाखो लोक रोजगारविहीन झाले. लोकांची मैलोन्‌मैल पायपीट झाली. न संपणार हे भय सगळीकडे व्यापून राहिले. प्रसारमाध्यमे, सरकार आपापली मते लोकांसमोर ठाशीवपणे मांडू लागली. लोक सैरभैर झाले. हे सगळे होत असताना लेखक संजय टाकळगव्हाणकर मात्र या विषयाकडे तटस्थपणे पाहताना आढळतात. कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी देण्यात आलेले सल्ले झुगारतात, मास्कवर बहिष्कार टाकतात, सोशल डिस्टंसिंग ही नवी समाजव्यवस्था उभी करण्याचा डाव आहे असे ते म्हणतात. **'कोरोना : गुलामगिरीचे नवे पर्व; टाळेबंदी : पर्यावरण रक्षणाचा नवा मार्ग'** या त्यांच्या पुस्तकात हा विषय विस्ताराने मांडला आहे. जागतिक सत्ताकारण अर्थव्यवस्था शोषकांची मक्तेदारी, आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयांच्या अंगाने त्यांची मांडणी आहे. भारतीय स्वातंत्र्यलढा, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू ते अलीकडील नरेंद्र मोदी कालखंडाचा संक्षिप्त आढावा घेताना आढळतात. लेखक कुठलीही बाजू घेत नाहीत. पण लेखनातील प्रवाहीपण हे दुर्बल घटकांच्या, वंचितांच्या बाजुने उभे राहताना दिसते. हे पुस्तक तीन भागांत विभागले आहे.

लोकशाही, स्वातंत्र्य, शांततेसाठी जागतिक युद्ध, दहशतवादाविरुद्ध जागतिक लढाई, कोरोनाविषाणू, जैविक महायुद्ध अशा भागात या विषयाचे विवेचन केले आहे. पहिल्या भागात जागतिक परिप्रेक्षातील राजकारण येते. पहिले महायुद्ध, दुसरे महायुद्ध व या महायुद्धाने निर्मिलेले प्रश्न, जागतिक राजकारणात पडलेले वर्ग, जगाची दोन ध्रुवात झालेली विभागणी, व्यापार– उदीम, जागतिक अर्थ केंद्रावर हुकुमत गाजवण्यासाठी चाललेली सत्तास्पर्धा, बहुराष्ट्रीय कंपन्या आणि उद्योगपतीच्या हिताची धोरणे, बहुसंख्य शेतकरी, कष्टकरी असंघटित कामगारांना आर्थिक, राजकीय, सामाजिक गुलामगिरीत नेणारे आहे. यातून एक पंगू समाज निर्माण होतो आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे. हिटलरचा उदय, ज्यू चे कांड, शस्त्रनिर्मितीच्या स्पर्धा आणि शस्त्र खरेदी वाढविण्यासाठी युद्धज्वर तेवत ठेवण्याचे राजकारण यावर प्रभावी भाष्य केले आहे. जगातील तेल केंद्र हे सत्ताकारण आणि राजकारणाचा केंद्रबिंदू राहिला आहे. आखाती भागातील संपन्न देशावर ताबा मिळविण्यासाठी बलाढ्य राष्ट्रात चाललेली स्पर्धा, अमेरिकेसारख्या राष्ट्राने जगावर बसवलेली दहशत, आखाती देशात केलेल्या कारवाया आणि त्यातून निर्माण झालेले प्रश्न या पुस्तकात दिसून येतात. अल् कायदा ओसामा बिन लादेन यांच्या दहशतवादी कारवाया या आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या परिपाकातून निर्माण झालेल्या होत्या. वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ल्याने संपूर्ण जागतिक राजकारण ढवळून निघाले. अमेरिकेने कांगावा करून इराकचे सर्वेसर्वा सद्दाम हुसेन यांना सत्तेवरून हटवून जागतिक राजकारणात वर्चस्व सिद्ध केले. जे आरोप इराकवर लावले होते ते सिद्ध करता आले नाही. तोवर सद्दाम पर्व संपले होते. समग्र दहशतवादाविरुद्ध आपण उभे आहोत हे मानचित्र अमेरिकेने नेहमी उभे केले आहे.

या चित्राला हादरा देण्यासाठी इतर प्रगत देश आता उभे टाकले आहेत.

अतिरेकी हव्यासातून मानवाने निर्माण केलेले पर्यावरणीय प्रश्नही यात दिसून येतात. संकरित बियाणे, कीटकनाशके यांचा अति वापर, त्यातून निर्माण झालेले नवे संकट उत्तमपणे मांडले आहे. १९७२ ला भारतात दुष्काळ पडला आणि त्यानंतर कृषी व्यवस्था अमूलाग्र बदलली. भूकबळी थांबले, पण पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले. त्यातून शेतकरी आत्महत्येपर्यंतचे चित्रण यात पाहायला मिळते. पाणी, हवा, जमीन, प्रदूषण हे प्रश्न किती गंभीर आहेत, याचे विवेचन केले आहे. अमेरिका- चीन संघर्ष हा व्यापारी भागीदारीतून निर्माण होतो आहे. कोरोना विषाणूजन्य आजार आणि जगभरात त्याचे होत असलेले मार्केटिंग यावर अमेरिका, चीन यांच्यात बेबनाव झाला आहे. याचे विश्लेषण करताना कोरोना हा विषय महाशक्तींनी अजिबात गांर्भीयाने घेतलेला नाही याचा उल्लेख करतात. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी गाफील राहिले आणि या प्रश्नावर मुलभूत मांडणी त्यांना करता आली नाही. तसेच माध्यमांचा बेजबाबदारपणा याची चिकित्सा केली आहे.

कोरोना हा प्रश्न वैश्विक करतांना याचे भांडवल केले गेले. वैद्यकीय क्षेत्राने लुटारूपणा केला. तपासणी कीटची विश्वासार्हता, रुग्ण सापडल्यावर करण्यात आलेला आततायीपणा यावर मत मांडताना लोकांचे तांडे बेरोजगार होऊन परतत होते. हे प्रश्न मात्र सरकार सोडवू शकले नाही याची खंत व्यक्त झाली आहे.

या सर्व बाबी मूठभर भांडवलदारांच्या सोयीच्या असल्याचे लेखक सांगतात. लॉकडाऊनमुळे लोकांना स्वयंशिस्त लागली. वाहतूकबंदीमुळे प्रदूषण थांबले. व्यसनाधीनता घटली. प्राणी, पशु, पक्षांना उसंत मिळाली. हे बरे झाले पण असंख्य लोक देशोधडीला लागले. याबद्दल खंत व्यक्त करतात. गांधीयुग, मोदीयुग, २०१४ नंतर लोकशाही शासनव्यवस्थेतील प्रमुख स्तंभ आणि संविधानिक संस्थांचे अध:पतन व्यथित करणारे आहे. लेखक या गोष्टीमुळे चिंतीत झाले आहेत.

## पर्यावरणीय जाणीव...

मानवी जीवनव्यवहाराने सर्व विश्व व्यापून टाकले आहे. सर्वत्र मानवी संचाराने पृथ्वीवरील चराचरास जागा उरलेली नाही. टाळेबंदीमुळे मानवी व्यवहार बंदिस्त झाला आणि प्राणिमात्रांनी मोकळा श्वास घे–तला. झाडे वाढली. मानवाने चालवलेली लूट थांबली. प्रूदषण थांबले. गंगा नदी स्वच्छ झाली. आकाश निरभ्र, निळे पाहायला मिळाले आणि या चराचराला जगण्याला उसंत मिळताना माणसालाही शुद्ध हवा पाणी मिळू लागले, ही सकारात्मकता लेखकाला दिसली आहे. मनुष्यसृष्टीचा विश्वस्त आहे म्हणून सामूहिक जबाबदारीची जाणीव लेखक करून देतो. भगवान महावीर, भगवान गौतम बुद्ध ते महात्मा गांधी यांचा दाखला देत स्वशोधनाची जाणीव माणसाला करून दिली आहे. म्हणून एकीकडे करोना गुलामगिरीचे नवे पर्व म्हणत अस–ताना दुसऱ्या बाजूला यात करण्यात आलेली टाळेबंदी पर्यावरण मुक्तीचा नवा मार्ग असल्याचे लेखक सांगतात. कोरोना स्थितीला नाकारतांना पर्यावरणाच्या जपवणुकीसाठी मात्र हा कोरोनामुळे लादलेला टाळेबंदीचा मार्ग प्रशस्त वाटतो. ही विरोधाभासी समज वाचकाला बुचकळ्यात टाकू शकते; पण संजय टाकळगव्हाणकर यांनी यात नकारात्मकतेस सकारात्मक पैलू जोडले आहेत, हे दृष्टीस येते. एकूणच हे पुस्तक एका विषयाचा सलग आकृतीबंध नाही. यात अनेक विषय, अनेक पदर येतात. अनेक विषयांचं प्रकटीकरण कदाचित लेखकाच्या मनातील ठसठस असावी. कोरोनाची पार्श्वभूमी स्वीकारतांना त्यावर अनेकांगांनी भाष्य आढळते. कधी त्याचे सकारात्मक तर कधी नकारात्मक असे दोन्ही पैलू समोर येतात. लेखक हे पत्रकार व चळवळीत असल्यामुळे लेखांकवजा लेखन आले आहे. जे लिहिलं आहे ते जाणीव आणि मनातील आक्रंदन आहे.

हे लेखन मानवी गुलामगिरी नाकारणारं आहे. लेखनाच्या पुस्तकी सौष्ठवाकडे न पाहता विषयाकडे पाहण्याचा लेखकाचा दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. पहिले महायुद्ध, भारतीय स्वातंत्र्य समर, आखाती युद्ध ते अलीकडील जागतिक राजकारण अशा खूप मोठ्या कालखंडाचं चित्रण करण्याचा प्रयत्न केला आहे. एवढा मोठा आवाका यात मावणारा नाही. त्यामुळे त्या पुस्तकास लेखन कसोटीवर न पाहता एक माध्यमकर्मी व चळवळ्या माणसाच्या मनातील व्यक्त झालेलं चिंतन म्हणून या पुस्तकाकडे पाहिल्यावर त्यातील प्रामाणिक भाव लक्षात येतात. संजय टाकळगव्हाणकर यांनी सक्षमपणे मांडणी केल्याचे दिसत राहते. त्यांच्या या लेखनास मनस्वी शुभेच्छा..!

– **डॉ. विलास ढवळे**
वैभव नगर, नांदेड
मो. ९४२२१८८१५२

दिनांक : २०.११.२०२०

**प्रिय संजय,**

तू लिखित **‘कोरोना : गुलामगिरीचे नवे पर्व टाळेबंदी : पर्यावरण रक्षणाचा नवा मार्ग’** हे पुस्तक वाचुन त्यास अभिप्रायरुपी शुभेच्छा देतांना मला वाटते की, तत्कालीन साम्राज्यवादाचा उदय, विस्तार आणि आजपर्यंत होत असलेला विस्तीर्ण प्रवास आणि यामुळे समाजातील दुबळ्या ठरलेल्या वर्गाचे अतोनात हाल हे अगदी स्पष्टपणे मांडले आहे. याबरोबर गेल्या काही महिन्यांपासून कोवीड–१९ या रोगामुळे संपूर्ण जगात माजलेला हाहाकार हे नैसर्गिक की? मानवी अभिलाषा पूर्ण करण्यासाठी मांडलेलं षडयंत्र आहे. यावर तटस्थ विचार मंथन केले आहे. कोवीड– १९ रोगाचा प्रादुर्भाव, संसर्ग रोखण्यासाठी केलेल्या टाळेबंदीमुळे जगावर पडलेली प्रदूषणाची गडद छाया काहीअंशी विरळ झाली आहे व यामुळे पर्यावरण स्वच्छ झाले. असा समतोल विचार या पुस्तकात मांडला आहे.

**या पुस्तकाला माझ्याकडून खुप शुभेच्छा!**

**श्री. कमलकिशोर कदम**
मा. शिक्षणमंत्री, महाराष्ट्र राज्य

# भाई जयंत पाटील

## विधान परिषद सदस्य

दि. ३ नोव्हेंबर २०२०

**प्रिय संजय टाकळगव्हाणकर**

**सप्रेम नमस्कार,**

एखाद्या संतापेक्षा शोध लावणारा वैज्ञानिक हा मला मोठा वाटतो असे आचार्य अत्रे यांचे मत आहे. तद्वदच आजही करमणूकीच्या लालित्य साहित्यीकापेक्षा शेतकरी, कष्टकरी, शोषीत वंचीताच्या शब्दाला वाचा फोडणारा लेखक मला श्रेष्ठ वाटतो. संजय टाकळगव्हाणकर हे त्यापैकी एक आहेत. **'कोरोना : गुलामगिरीचे नवे पर्व, टाळेबंदी: पर्यावरण रक्षणाचा नवा मार्ग'** या पुस्तकात जागतिक सत्ताकारण, अर्थव्यवस्था, शोषकांची मक्तेदारी, अंतरराष्ट्रीय राजकारण अशी विविध विषयांची मांडणी आपल्या पुस्तकातून विस्ताराने मांडली आहे. आपल्या पुस्तकास माझ्या अनंत शुभच्छा!

महात्मा फुले शिक्षक परिषदेच्या माध्यमातून माझी आणि संजय टाकळगव्हाणकर यांची ओळख झाली. त्यानंतर त्यांचे राजकीय, प्रासंगीक अभ्यासू लिखाण वाचण्यात आल्यानंतर त्या ओळखीला उजाळा मिळाला. त्यांच्या लिखाणाची नाळ ही आमच्या सत्यशोधकिय विचाराशी गुंफली आहे. सध्याच्या काळात संजय टाकळगव्हाणकर यांनी कोवीड-१९ या रोगा संदर्भात समाजात निर्माण झालेली (जाणीव पूर्वक केलेली) भिती व यामुळे देशात कष्टकरी, कामगार, वंचितांची होणारी ससेहोलपट आणि देशात माजलेली अनागोंदी त्यांनी तटस्थपणे व निर्भिडपणे त्यांच्या पुस्तकात मांडली आहे. ही लेखमाला आमच्या दै. कृषीवल मधुन प्रसिद्ध करतांना मला त्यांचे लिखाण त्यांची समाजातील उपेक्षित घटका बाबतची संवेदना प्रकर्षाने जाणवली. त्यांचे जगाच्या राजकीय विस्तारा बाबतचे व त्यामुळे वाढलेल्या मानवी गुलामगिरी व तत्कालिन परिस्थीती आणि त्याचे दूरगामी परिणाम यावरील त्याच्या लेखातील चिंतन खरचं कौतुकास्पद व चिंतणीय आहे. याच दरम्यान जग हे प्रदूषणाच्या गर्द छायेखाली उसासे घेत असताना कोवीड-१९ या रोगाच्या

# भाई जयंत पाटील

विधान परिषद सदस्य

निमित्ताने त्यानी जगातील काही महासत्तानी जाणिवपूर्वक सबंध जगावर कश्या प्रकारे जैविक अस्त्रांचा वापर करून नवीन मानवी गुलामगिरी निर्माण करण्याचा विखारी, अघोरी प्रयोग केला आहे हे त्यांनी पोटतिडकीने आणि विज्ञानाच्या कसोटीवर सांगितले आहे. या कोवीड-१९च्या निमित्ताने जगातील मानव रक्षणासाठी केलेली टाळेबंदी भलेही काही उद्देशाने झाली असली पण त्या निमित्ताने मात्र प्रदूषणाचे गडद झालेले धुके या टाळेबंदी दरम्यान बरेचसे निवळलेले दिसत आहे. केलेल्या टाळेबंदीमुळे वनराई, पशु, पक्षी व पर्यावरणात नवीन बहर आला आहे. ही एक नवी बाजू त्यांच्या चाणाक्ष नजरेतून निसटली नाही. यावरून त्यांचे निसर्गाविषयीचे संवेदनशिल मन ठळकपणे दिसून येते.

संजय टाकळगव्हाणकर हे ज्या विज्ञानवादी, सत्यशोधकिय विचाराने प्रेरीत आहेत. त्या विचारांचे आमचे दै. कृषीवल हे अशा विचारासाठी व्यासपीठ आहे. फुले, शाहू, आंबेडकरांचे विचार आज रायगडात मागील ८३ वर्षांपासून अहोरात्र सत्यशोधकीय विचाराना प्रेरित असणारे आमचे दै. कृषीवल अशा पुरोगामी विचारांचा जागर करीत आहेत. संजय टाकळगव्हाणकर हे मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनानी कै. अण्णाराव टाकळगव्हाणकर यांचे सुपुत्र आहेत. क्रांतीकारी विचारांचे बीज, वैचारीक बेधडक लिखाण हे गुण त्यांना त्यांच्या रक्तातूनच प्राप्त झाले आहेत. संजय टाकळगव्हाणकर यांच्या आमच्या दै. कृषीवल मधून प्रसिद्ध झालेल्या या लेखमालेचे **'कोरोना : गुलामगिरीचे नवे पर्व, टाळेबंदी: पर्यावरण रक्षणाचा नवा मार्ग'** या पुस्तक रुपाने प्रसिद्ध करावयाचे ऐकून खूप आनंद वाटला. त्यांच्या अशा सिद्धहस्त लेखणीला माझ्याकडून शुभेच्छा!

आपला स्नेहांकित

**- भाई जयंत पाटील**

विधान परिषद सदस्य

मु.पो. आंबेपूर-पेझारी, ता. अलिबाग, जि. रायगड, फोन : ०२१४१-२२२२९०, २२४५५६

Email : jayantpwp@gmai.com

दिनांक : २०.११.२०२०

**प्रिय संजय टाकळगव्हाणकर,**

व्यक्तिस्वातंत्र्य हे अनेक सामाजिक मूल्यांपैकी एक श्रेष्ठ मुल्य आहे व ते स्वातंत्र्य उपभोगण्याचा सर्वाधिकार सर्व प्राणिमात्रांना समान असताना काही सत्ताधिशांनी मात्र या मुल्याचे स्वहव्यासापोटी खंडन केलेले आहे. हे करीत असताना त्यांनी मानवी रक्ताचे पाट कसे वाहिले. मानवी गुलामगिरी, शोषितांचे हाल ही सत्य परिस्थिती आपण लिखित '**कोरोना : गुलामगिरीचे नवे पर्व, टाळेबंदी: पर्यावरण रक्षणाचा नवा मार्ग**' या पुस्तकात बेधडकपणे मांडली आहे. साम्राज्यवाद, विस्तारवाद आज नव्या रुपाने जगासमोर मांडण्याची नवी पद्धत या सत्ताअधिकाऱ्यांनी कोविड–१९ या रोगामार्फत पसरवून जगाचे शोषण चालवले आहे व यामुळे नवी गुलामगिरी कशी येऊ पाहात आहे याची परखड मांडणी पुस्तकात दिसून येते. देशात भयानक परिस्थिती असताना आपण हे वास्तव लिहिण्याचा प्रयत्न केलात याबद्दल आपणांस व आपल्या पुस्तकास हार्दिक शुभेच्छा!

**– ब्रिगेडियर सुधीर सावंत**

# अनुक्रमणिका

१) भौतिक प्रगती आणि महासत्ता १९

२) लोकशाही, स्वातंत्र्य व शांततेसाठी जागतिक युद्ध २३

३) इस्लामीक दहशतवाद आणि जागतिक संकट २६

४) भूकबळीतून हरीतक्रांती व शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे दुष्टचक्र ३१

५) कोरोना विषाणू विरुद्धचा लढा आणि चौथे महायुद्ध ३५

६) भारतावरील परकिय आक्रमणे, कोरोना युद्ध व हिंदवी स्वराज्य ४५

७) कोरोना संकट व गोंधळलेले सरकार. ५०

८) उद्योगपतींच्या संपत्तीवरही सिलिंग ॲक्ट लावण्याची गरज ५६

९) लोकशाहीतील स्वातंत्र्याचा उलटा प्रवास ६३

१०) ... तर कोविडनंतर नव्या जागतिक व्यवस्थेचे

नेतृत्त्व भारत करेल! ६९



१



# भौतिक प्रगती आणि महासत्ता

जगात कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग प्रारंभ झाले आहे. अमेरिका – चीन यांच्यातील व्यापारी युद्धामुळे उभय देशांबरोबरच अनेक प्रगत व विकसनशील देश आर्थिक संकटात सापडले आहेत. एक युद्ध संपल्यानंतर दुसरे युद्ध सुरू होते. जगात पहिले महायुद्ध संपल्यानंतर दुसरे महायुद्ध झाले. या दोन्ही महायुद्धात प्रतिस्पर्धी महासत्ता प्रत्यक्ष युद्धात एकमेकांसमोर उभ्या राहिल्या होत्या.

दुसरे महायुद्ध संपल्यासंपल्या तिसऱ्या महायुद्धाची पायाभरणी झाली. या तिसऱ्या महायुद्धास शितयुद्ध म्हणून ओळखले जाते. या युद्धात प्रतिस्पर्धी महाशक्ती प्रत्यक्ष युद्ध भूमीवर आमने-सामने उभे न राहता हे युद्ध छुप्या पद्धतीने लढण्यात आले. शितयुद्धाच्या उत्तरार्धात अमेरिका - सोव्हियत संघ (आताचा रशिया) या दोन महाशक्ती एकत्र आल्या. त्यांनतर जगात एक नवीन जागतिक व्यवस्था निर्माण झाली. या नवीन जागतिक व्यवस्थेत चीन हा देश दुसरी महासत्ता म्हणून अमेरिकेसमोर उभा टाकला. या दोन्ही महासत्तेत व्यापार युद्ध भडकले. हे युद्ध उभयी देशाच्या हिताला धोका निर्माण करीत असल्याचे लक्षात आल्यानंतर या दोन्ही महाशक्तीमध्ये व्यापार करारावर समझोता झाला. अमेरिका-चीन यांच्यातील व्यापारी समझोत्यातूनच जैविक युद्धाचा जन्म झाला. हे जैविक युद्ध जगातील चौथे महायुद्ध आहे असे बोलले जात आहे. कोरोना विषाणूचा संसर्ग हा चौथ्या महायुद्धाची सुरूवात आहे.

आधुनिक जगाच्या इतिहासात प्रामुख्याने दोन महायुद्धांचाच उल्लेख केला जातो. दुसऱ्या महायुद्धाच्या नंतरच्या काळास शितयुद्ध म्हणून संबोधले जाते. १९४६ ते १९९१ हा शितयुद्धाचा सर्वसाधारण कालखंड म्हणून ओळखला जातो. या शितयुद्धात जगातील महासत्ता या प्रत्यक्ष युद्ध भूमीवर आमने - सामने न येता आपल्या वर्चस्ववादाची व साम्राज्यवादांची लढाई अप्रत्यक्षपणे लढत होत्या. काही इतिहासकारांच्या मते शितयुद्ध हे तिसरे महायुद्धच होते. या तिन्ही महायुद्धात प्रत्यक्ष लष्करी सामग्रीचा प्रचंड वापर करण्यात आला. लाखो लोक युद्धात मारल्या गेले. युद्धानंतर निर्माण झालेल्या अराजक ते बेरोजगारी, भूकबळी, आर्थिक अस्थिरता यामुळेही युद्धात मरण पावलेल्या लोकांपेक्षा कितीतरी अधिक पटीने लोक युद्धानंतरच्या उद्‌भलेल्या परिस्थितीत मृत्युमुखी पडली. या महायुद्धात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. प्रत्यक्ष युद्धभुमीवर जाऊन बंदुका व तोफ्यांच्या सहाय्याने परस्पर हल्ले याबरोबरच जल (नौदल) वायुदल व अवकाश तंत्रज्ञानाचा व आण्विक अस्त्रांचा वापर करण्यात आला.

क्षेपणास्त्रे ही शत्रू पक्षांच्या भूमीवर न जाता शेकडो किलोमीटर वरून हल्ले करण्याचे तंत्र या युद्धात वापरले. हे युद्ध भुप्रदेशावरील कब्जा व सत्तेच्या वर्चस्वासाठी लढण्यात आले होते. जगासमोर कोरोनारुपी जैविक महायुद्ध हे आजपर्यंतच्या लढलेल्या युद्धापेक्षा भिन्न आहे. या युद्धात शस्त्राचा अथवा लष्करी सामुग्री व लष्कराची गरज नाही. हे युद्ध कोण्या एका देशाविरुद्ध नाही. पण हे युद्ध अत्यंत भयंकर आहे. या युद्धाचे परिणाम जगाची व्यवस्था बदलण्यात होणार आहेत. हे युद्ध देशादेशांत निर्माण झालेल्या मूठभर बहुराष्ट्रीय कंपन्या/ उद्योजकांच्या हितासाठी निर्माण करण्यात आले आहे. या युद्धाच्या माध्यमातून सबंध देशातील बहुसंख्य शेतकरी, कष्टकरी, असंघटित कामगारांना आर्थिक, राजकीय, सामाजिक, आरोग्य व बौद्धीक गुलामगिरीत नेणारे असून या युद्धाने जगात एक पंगू समाज निर्माण होणार आहे. त्यामुळे या कोरोना विषाणू संसर्गाच्या महायुद्धाचे जगाच्या इतिहासावर अत्यंत दूरगामी परिणाम होणार असल्याने याचे गांभीर्य सर्वांनी ओळखले पाहिजे. १८ व्या शतकात इंग्लंडमध्ये यंत्राचा शोध लागला १८ व्या शतकाच्या मध्यानंतर व १९ व्या शतकाच्या प्रारंभी युरोपमध्ये औद्योगिक क्रांती झाली. या उद्योगांमुळे युरोप हा जागतिक औद्योगिक क्रांतीचे केंद्र ठरले. त्यामुळे जागतिक व्यापार वाढला. उद्योगासाठी लागणारा कच्चा माल यासाठी युरोपीयन लोकांची जगात भटकंती वाढली. पर्यायाने जगावर युरोपीयन साम्राज्याच्या वसाहती वाढल्या. पुढे कच्चा माल व कारखान्यातून तयार झालेले उत्पादने त्यासाठीची बाजारपेठेच्या या विस्तारवादातून जगात दोन महायुद्ध झाले. या युद्धामुळे जगात लाखो लोक मृत्युमुखी पडले. जगावर आर्थिक अरिष्ट ओढल्या गेले. भांडवली देशांचे साम्राज्य अबाधित ठेवण्या बरोबरच व विस्तारासाठी लष्कर व आधुनिक लष्करी सामुग्रीची आवश्यकता वाढली. त्यामुळे शस्त्रनिर्मितीच्या उद्योगाला मोठ्या प्रमाणात भरभराटी आली.

यात प्रामुख्याने अमेरिका, युरोपीय राष्ट्रे एका बाजूला तर दुसऱ्या बाजूला रशिया व इतर राष्ट्रसमूह गट अशी जगाची विभागणी पडली. ज्यू या व्यापारी समाजाने शत्रू देशांना आधुनिक शस्त्रांचे तंत्रज्ञान व शस्त्र पुरविली. या संशयावरून जर्मनीत व जगभरात जर्मनीचा हुकुमशहा हिटलर यांनी ज्यू लोकांची हत्या केली. या हत्याकांडात लाखांवर ज्यू व्यापारी लोक मारले गेले. यावरून शस्त्रनिर्मितीचे तंत्रज्ञान व कारखानदारी यांना किती महत्त्व होते हे दिसून येते. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीने शस्त्र निर्माण करणारे उद्योग व व्यापारी यांना नव्याने शस्त्रांची बाजारपेठ उपलब्ध करण्याची गरज भासू लागली. त्याच दरम्यान ब्रिटीश वसाहती देशातील स्वातंत्र्याच्या चळवळींना बळ देणाऱ्या सोव्हियत संघ व साम्यवादी देश समूहाबद्दल युरोपीयन व अमेरिकन भांडवलदारी राष्ट्रसमुहात राग होता. यातूनच नाटो या राष्ट्र समुहाची स्थापना झाली. त्यानंतर सोव्हियत संघाने वार्सोकरार केला. शस्त्र कारखानदारांना नव्याने बाजारपेठेची गरज व दुसऱ्या महायुद्धातील प्रतिस्पर्धी महासत्तेने स्थापन केलेल्या राष्ट्रसमूह संघटना यामुळे जगात शितयुद्धाची ठिणगी पडली.





२



# लोकशाही, स्वातंत्र्य व शांततेसाठी जागतिकी युद्ध

द्वितीय महायुद्धातून जगातील महाशक्तींनी काही गोष्टी शिकल्या. प्रत्यक्ष आमने – सामने युद्ध न करता कशा पद्धतीने साम्राज्य विस्तार करावा याची त्यांनी व्यूहरचना केली. अमेरिका व युरोपीयन राष्ट्र यांनी युनो व नाटोमार्फत तर रशिया व कम्युनिस्ट देशांनी वार्सोकरारा मार्फत अत्यंत  चाणाक्ष पद्धतीने जगात आपले विस्तारवादी धोरण राबविण्यास सुरूवात केली.

जागतिक शांतता, लोकशाही, स्वातंत्र, मानवी हक्क, आण्विक अस्त्र या शब्दांना जागतिक (वैश्विक) रूप दिले. त्या माध्यमातून जगातील सर्व खंडात युद्ध, गृहयुद्ध, स्वातंत्र्यासाठीचे लढे संघर्ष उभे केले.

**खनिज संपत्ती लुटण्यासाठी शांतता व लोकशाहीसाठी अफ्रिकेत युद्ध - गृहयुद्ध व संघर्षः** तिसरे जग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आफ्रिकी देशातील संपन्न खनिजसाठे लुटण्यासाठी जगातील या दोन्ही महाशक्तीने या प्रदेशात युद्धासाठी खतपाणी घातले. या आफ्रिकी देशात देशा-देशांतर्गत युद्ध भडकविले व ते दीर्घ काळ चेतवत ठेवले. यामध्ये प्रामुख्याने इथोपियासोमानीया, सुदाम कांगो, दक्षिण आफ्रिका, झांझीबा, युगांडा, नामीबिया आदी देशात युद्ध-गृहयुद्ध, संघर्ष यादवी माजून प्रचंड रक्तपात झाला. सुमारे ३ ते ४ दशक आफ्रिकी देश यादवीत होरपळत होते. या यादवीमुळे शस्त्र निर्माण करणाऱ्या उद्योगपतींना मोठी बाजारपेठ उपलब्ध झाली. अब्जावधी रुपयांच्या शस्त्रांची विक्री या संघर्षाच्या माध्यमातून झाली. या देशांना संघर्षात गूंतवून मौल्यवान खनिज संपत्तीची अक्षरशः लूट करण्यात आली. युनायटेड किंग्डम (युके) देशातील डीएफआयडी या संस्थेने दक्षिण अफ्रिकेतील १९४६ ते २००४ या कालखंडात झालेल्या यादवीमुळे मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या प्रसिद्ध केली. या कालखंडात सुमारे १५ लाख २८ हजार ४८९ लोक मारले गेले. सततचा संघर्ष त्यामुळे राजकीय अस्थिरता युद्धाच्या भीतीने स्थलांतर झालेले लोक या कारणास्तव शेती उद्योग, व्यवसाय ठप्प झाल्याने दरवर्षी सुमारे ४ ते ५ लाख पुरुष / महिला व लहान मुले यांचा भूकबळीने मृत्यू झाला. याशिवाय युद्धामुळे आरोग्याच्या व साथीच्या रोगाच्या फैलावामुळे सरासरी १ लाख लोक दरवर्षी या कालावधीत दगावले. द न्युयॉर्क टाईम्सच्या १९९२ च्या अंकात शितयुद्धानंतर तिसऱ्या जगातील वास्तव यासंदर्भात एक लेख प्रकाशित झाला.

या लेखात असे म्हटले आहे की, अन्न, आरोग्य, शिक्षण, रोजगार, कुपोषण यामुळे गंभीर स्वरूप या आफ्रिकी देशात निर्माण झाले आहे. ६० लाख लोक हे एड्स व इतर गंभीर आजाराने पीडित आहेत. आज जगातील कोणतीही शक्ती मदतीसाठी पुढे येत नाही. संघर्षाच्या कार्यकाळात अब्जावधी रुपये किमतीचे शस्त्र व लष्करी मदत देणारे देश आज कुठे आहेत? असा प्रश्न या देशातील सुजान नागरीक उपस्थित करीत आहेत.

















# ३ इस्लामीक दहशतवाद व जागतीक संकट

ऊर्जेचे प्रमुख स्त्रोत असणाऱ्या खनिज तेलाचे मोठे भांडार मध्य-पूर्वेतील आखाती देशात आहेत. या खनिज तेलाच्या भांडारावर नियंत्रणासाठी अमेरिका व सोव्हियत संघ अन्य औद्योगिक प्रगत देशांनी आखाती देशात संघर्ष व युद्ध पेटविले. इस्त्राईल राष्ट्राची निर्मिती ही याच हेतूने झाली. त्यात अमेरिकेचे मोठे योगदान आहे. इस्त्राईल विरुद्ध अरब देश असा संघर्ष गेल्या अनेक दशकांपासून आजपर्यंत कायम आहे.

इराक – इराण युद्ध, इराकचा कुवैतवर हल्ला. पॅलेस्टाईन – इजिप्त युद्ध, इराण – इस्त्राईल संघर्ष, लेबनॉन गृह युद्ध, सिरिया – इजिप्त युद्ध, सिरिया संघर्ष, सियासुन्नी धार्मिक वाद त्यातून इस्लामी दहशतवादी संघटनेचा उदय यासारखे असंख्य संघर्ष निर्माण करून या देशातील तेल साठ्यांवर आपले नियंत्रण व त्या माध्यमातून पर्यायाने जगावर नियंत्रण या राक्षसी वृत्तीतून अनेक वर्ष आखाती देशातील युद्धाचा भडका चेतवत ठेवण्याचे काम करण्यात आले. पाच ते सहा दशकांपासून सुरू असलेल्या या आखाती संघर्षात अंदाजे १७ लाख ७२ हजार ९९० लोक ठार झाले. आखाती प्रदेशात आपल्या हिताचे सरकार स्थापन करणे, शांततेच्या नावाखाली या प्रदेशात आपल्या देशाचे सैन्य तैनात करणे, प्रत्यक्ष – अप्रत्यक्ष आखाती देशांवर आपला कब्जा करून कवडीमोल भावात खनिज तेल विकत घेणे हा सर्रास उद्योग अमेरिका व औद्योगिक प्रगत राष्ट्राने चालू ठेवला. खाडी देशातही आरोग्य व अन्नाच्या गंभीर प्रश्नांमुळे दरवर्षी हजारो लोक बळी ठरत आहेत.

## वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला आणि इस्लामिक दहशतवादाचे जागतिक संकट

१९७९ साली अफगानिस्तानात प्रस्तावित गॅस लाईनचा आंतरराष्ट्रीय प्रकल्प त्यातून सोव्हियत संघाचा अफगानिस्तानावर ताबा. सोव्हियत संघाच्या सैन्यांना विरोध करण्यासाठी अमेरिकेने श्रीमंत अरब कुटुंबातील युवक ओसामाबीन लादेन यास कट्टर इस्लामिक दहशतवादी संघटना निर्माण करण्यासाठी केलेले सहकार्य यातून ओसामाबीन लादेन यांनी अफगानिस्तान स्थित सोव्हियत सैन्यावर अनेक वेळा सशस्त्र हल्ले केले. पुढे १९८९ साली सोव्हियत संघाचे तत्कालीन राष्ट्रपती मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी ग्लासनोस्त व पेरेयीस्त्राईका म्हणजे उदारमतवाद व खुलेपण ही अर्थ व्यवस्था स्वीकारली. या घटनेनंतर सोव्हियत संघाचे विभाजन झाले. जगातील साम्यवादी कम्युनिस्ट शक्ती क्षीण झाली. जगात अमेरिका ही एकमेव निरंकुश महासत्ता अस्तित्वात आली.


माल्टा येथे झालेल्या जागतिक व्यापार परिषदेत अमेरिकेने सोव्हियत संघाला व्यापारी संघटनेत समाविष्ट करण्याची घोषणा केली. त्यामुळे अमेरिका म्हणेल ती पूर्व दिशा ठरणारी नवीन जागतिक व्यवस्था निर्माण झाली. पुढे सोव्हियत संघ / रशियाने आखाती देशातील अमेरिकी सैन्याच्या उपस्थितीचे समर्थन करून इराकचे राष्ट्राध्यक्ष सद्दाम हुसेन यांच्या विरोधात अमेरिकेने प्रस्तावित केलेल्या कारवाईस पाठिंबा दिला. अमेरिकी सैन्याच्या आखाती देशातील उपस्थितीस सद्दाम हुसैन बरोबर ओसामाबीन लादेन याचाही विरोध होता. सद्दाम हुसैन यांच्या अल कायदा या दहशतवादी संघटनेचे सर्व अरब देशासह जागतिक पातळीवर नेटवर्क होते. अल कायदा संघटनेने अनेक वेळा लष्करी व नागरीक स्थळावर हल्लेही केले होते. या कारणास्तव अमेरिकेच्या हितसंबंधात सद्दाम हुसैन व ओसामाबीन लादेन हे दोघे येत असल्याने या दोघांना कोणत्याही परिस्थितीत ठार करण्याचा अमेरिकेने संकल्प केला.

अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरवर ११ सप्टेंबर २००३ रोजी अल कायदा या दहशतवादी संघटनेने पेंटॉगॉन येथून विमानाचे अपहरण करून हल्ला केला. या हल्ल्यात अमेरिकेचे अंदाजे ३ हजार नागरीक ठार झाले. महाशक्तीवरील या हल्ल्यामुळे जग खडबडून जागे झाले. या हल्ल्याबाबत जगात भिन्न मतप्रवाह आहेत. अमेरिकेने सद्दाम हुसैन व लादेन यांना या हल्ल्याप्रकरणी दोषी ठरवून त्यांच्याविरुद्ध सैनिकी कारवाईचा निश्चय केला. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू बुश यांनी दहशतवादाविरुद्धचा लढा हा ग्लोबल वर्ल्ड वॉरफ घोषित केला. ओसामाबीन लादेनच्या अल कायदा या संघटनेस सद्दाम हुसैन यांनी मदत केली व सद्दाम हुसैन यांनी विनाशकारी आण्विक अस्त्रे इराकमध्ये दडवून ठेवले असा ठपका ठेवून अमेरिकेने इराकविरुद्ध युद्ध छेडले. या युद्धात सद्दाम हुसैन यांच्या बाथ पक्षाचा तक्ता पालट करण्यात आला. सद्दाम हुसैन यांना पकडण्यात आले.

एका सार्वभौम देशाच्या राष्ट्राध्यक्षांना अमेरिकेने स्वत:च्या न्यायालयात उभे करून खटला चालविला. पुढे सद्दाम हुसैन यांना फासावर लटकविले. सद्दाम हुसैन यांना फासावर लटकविल्यानंतर इराकमध्ये कोणतेही आण्विक अस्त्र व संहारक शस्त्र सापडले नाहीत. तसेच सद्दाम हुसैन यांनी अल कायदा या संघटनेला मदत केल्याचे कोणतेच कागदपत्री पुरावे सापडले नाहीत. उलट वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या हल्ल्याबाबत अमेरिकेच्या गुप्तचर संघटनेने हलगर्जी केल्याचा संशय असल्याचे पुढे आले. ११ सप्टेंबर रोजी हल्ल्यांच्या दिवशी वर्ल्ड ट्रेडमध्ये काम करणारे ४ हजार ज्यू लोक सामूहिक रजेवर असल्याची माहिती समोर आली. या लोकांना या हल्ल्याबाबत पूर्वकल्पना होती का? अशी शंका उपस्थित करण्यात आली. (एआर ॲक्शन रिपोर्टर ऑनलाईन दि. २५ नोव्हेंबर २००१)

वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ल्यानंतर अमेरिकेने इस्लामिक दहशतवादाचे भूत जगासमोर उभे केले. काळानुरूप वेगवेगळ्या नावाच्या तब्बल ५० दहशतवादी संघटना जगासमोर आणल्या. यात हमास, अल कायदा, तालिबानी, लष्कर ए तोयबा, बोकोहराम, इसिस इत्यादी कट्टरवादी दहशतवादी संघटनेकडून जगाला धोका असल्याचा प्रपोगंडा केला. शस्त्राचा आंतरराष्ट्रीय व्यापार तेजीत आणला. जगातील ६० टक्के देशांना अब्जावधी डॉलर्सचे शस्त्र खरेदी करण्यास भाग पाडले. सन २०१४–१८ या कालावधीत जागतिक शस्त्राचा व्यापार २७,००,००,००० अमेरिकन डॉलर इतका झाला. (स्टॉक हिम इंटरनॅशनल पिस रिसर्च इन्स्टीट्यूट अहवाल, एसआय पीआरएल) सन २०१४ मध्ये भारताने ५.६ बिलियन अमेरिकन डॉलर्स (अंदाजे) भारतीय किमतीनुसार ४२५ अब्ज ६० कोटी रुपये किमतीचे शस्त्र आयात केले. भारताचा त्यावर्षी शस्त्र खरेदीचा जागतिक दुसरा क्रमांक होता. १९५० ते २०१८ पर्यंत भारताने केलेल्या शस्त्र खरेदीत जगात भारताचा क्रमांक चौथा लागतो.

यावरून  आंतरराष्ट्रीय शस्त्र विक्रीचा व्यापार किती प्रचंड आहे हे आपणांस लक्षात येईल. युनो, आंतरराष्ट्रीय बँक, जागतिक नाणेनिधी या संस्था अमेरिका व प्रगत राष्ट्रांच्या हातातील बाहुल्या आहेत. कधी शत्रू देशांकडून धोका तर कधी इस्लामी दहशतवादा–चा जागतिक धोका अशी वेगवेगळी संकटे उभी करून शस्त्र खरेदी करण्यास भारतासह इतर विकसनशील राष्ट्रास भाग पाडण्यात येते. ज्या देशांनी शस्त्र खरेदी करार करण्यास नकार दिला त्या देशांच्या विकासासाठी व कल्याणकारी योजनेसाठी जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडून मदत नाकारण्यात येते हे वास्तविक सत्य आहे. भारताने आजपर्यंत शस्त्र व लढाऊ विमाने, आण्विक नौदल साहित्य, क्षेपणास्त्रे आदी सैनिकी सामुग्रीसाठी केलेल्या खर्चाच्या २० टक्के खर्च जरी सार्वजनिक आरोग्य व शिक्षणासाठी केला असता तर प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्र व सर्व शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळा या जागतिक दर्जाच्या झाल्या असत्या. विकसनशील देशांना धोरण ठरविण्याचा कोणताच अधिकार जगातील या बड्या देशांनी व कंपन्यांनी दिला नाही हे कटुसत्य आहे. प्रगत देश अमेरिका, फ्रान्स, रशिया, युके, जर्मनी, ईटली, चीन या देशातील शस्त्र निर्मिती करणाऱ्या उद्योजकांकडून सुमारे २५ ते ३० टक्के कर हा त्या–त्या देशांना मिळत असतो. अमेरिकेत सर्वाधिक जास्त शस्त्र निर्माण करणारे उद्योग कार्यरत आहेत. त्यामुळे या कंपन्यांचा दबाव साऱ्या जगावर असतो. एका कंपनीची वार्षिक उलाढाल ही भारतासारख्या देशाच्या पंचवार्षिक आर्थिक बजेटपेक्षा कितीतरी पटीने अधिक असते यावरून एका क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपन्यांची आर्थिक ताकद किती आहे हे दिसून येते अशा विविध क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपन्यांचा व्यवहार जागतिक पातळीवर होत असतो.








४

# भुकबळीतून हरितक्रांती व शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे दुष्टचक्र



शितयुद्धाच्या काळात भुकबळीची समस्या ही महासत्तेच्या वर्चस्ववादातून निर्माण झाली. या कार्यकाळात सुमारे ६० ते ७० लाख लोक जगात भुकबळीने मृत्युमुखी पडली. अफ्रिकेतील यादवींच्या काळात व नंतर सुमारे ५० लाख लोक या भुकबळीची शिकार ठरली. भारत देशात १९७२ साली दुष्काळ पडला. त्यानंतर आपल्या देशाने अन्नधान्यांच्या स्वावलंबतेसाठी उपाययोजना सुरू केली.

आधुनिक शेतीच्या नावाखाली संकरित बियाणांच्या माध्यमातून पाश्चिमात्य बियाणांच्या वापरामुळे देशाच्या ग्रामीण शेतीव्यवस्थेवर किती दूरगामी परिणाम झाले हे लक्षात येते. हरितक्रांतीमुळे देशात संकरित बियाणे आले. संकरित बियाण्यांच्या उगवणीसाठी रासायनिक खते व किटकनाशके आली. संकरित बियाणांमुळे आपला भारत देश काही वर्षातच अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला. बऱ्याच प्रमाणात भूकबळीचे प्रमाण देशात कमी झाले. पण या संकरित बियाण्यांच्या शेतीमुळे देशावर एक नवीन संकट उभे राहिले. भारताची कृषी संस्कृती ही तीन हजार वर्षापेक्षा अधिक जुनी आहे, पण या तीन हजार वर्षाच्या कार्यकाळात शेतकरी आत्महत्येच्या घटना कधीच घडल्याची नोंद नाही. पण स्वातंत्र्यानंतर आलेल्या हरितक्रांतीतून शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सातत्याने सुरू आहे. दरवर्षी सरासरी १२ हजारांपेक्षा अधिक शेतकरी हे आर्थिक संकटामुळे आत्महत्या करतात. विषारी कीटकनाशकाच्या संपर्कात येवून विष बाधित होऊन मृत्यू पावलेल्या शेतकऱ्यांची दरवर्षीची सरासरी १ हजार इतकी आहे. विदर्भात २०१७ साली एकट्या यवतमाळ जिल्ह्यात कीटकनाशकामुळे २१ शेतकरी मृत्युमुखी पडल्याची नोंद आहे. खताचा व कीटकनाशकाचा अधिक वापर यामुळे शेतीचे गणित बिघडले आहे. देशातील राज्याराज्यांतील शेतकऱ्यांच्या वेगवेगळ्या समस्या समोर येत आहेत. देशात हरितक्रांतीत अग्रभागी असणारा सुजलाम, सुफलाम अशा पंजाब राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था ही फार बिकट आहे. देशाला संरक्षण व देशातील नागरिकांना पुरेल एवढे गव्हाचे विक्रमी उत्पन्न करणाऱ्या पंजाब राज्यातला शेतकरी हा अनेक समस्यांनी ग्रासला आहे. अतिरासायनिक खतांचा वापर, कीटकनाशकांचा वापर यामुळे पंजाब राज्यातील अन्न, पाणी व हवा हे अत्यंत प्रदूषित व विषारी झाली आहे.



जागतिक आरोग्य संघटनेच्या सहाय्याने पंजाब राज्यातील आरोग्य विभागामार्फत सन २०१२ मध्ये केलेल्या अभ्यास अहवालातून एक भयानक सत्य देशासमोर आले आहे. भारतातील सर्वाधिक कॅन्सरने मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या पंजाब राज्यातील ग्रामीण भागातील आहे. कारण या ठिकाणच्या अन्नातून व पाण्यातून विषारी रासायनिक घटकामुळे हा कॅन्सर होतो असे या अहवालात स्पष्ट नमूद केले आहे २०१२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालात मागील पाच वर्षाची कॅन्सरने मृत्यू पावलेल्यांची आकडेवारी दिलेली आहे. ३४ हजार ४३० लोक हे २०१२ पूर्वी कॅन्सरने मरण पावले. सरासरी वर्षाला ६ हजार ८८८ लोक कॅन्सरने दगावले. सध्या पंजाब राज्यात कॅन्सरने मृत्यूचे प्रमाण हे १ हजार ते २ हजार इतके आहे.

१९६०-७० च्या दशकात टोळधाड कीड बंदोबस्तासाठी बीएचसी व मलेरियाच्या निर्मूलनासाठी डीडीटी या दोन कीटकनाशकांचा वापर भारतात होत होता. आज सुमारे १४५ प्रकारची विषारी किटकनाशके शेती व्यवसायासाठी वापरण्यात येतात. यातील अनेक कीटकनाशकांना विदेशात बंदी आहे. रासायनिक खते व कीटकनाशक तयार करणाऱ्या कारखान्यांमुळे मोठ्या प्रमाणात पर्यावरणाची हानी होत असल्याचे लक्षात आल्यानंतर बहुराष्ट्रीय कंपन्यांनी विकसित देशातच हे कारखाने झाले आहेत. तिथे विषारी वायू गळतीने हजारो लोक मृत्युमुखी पडले. हजारो लोकांना या विषारी वायूच्या गळतीमुळे गंभीर आजाराने जखडले.

जादा उत्पन्न घेण्याच्या नादात आधुनिक शेतीच्या नावाखाली भारतीय शेतकऱ्यांनी संकरित बियाणे, रासायनिक खत व कीटकनाशकांचा बेसुमार वापर केला.

आज आपली जमीन, पाणी व हवा ही प्रदूषित झाली आहे. मनुष्यहानीसह पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. शेतीचे जैविक चक्र पालटून गेले आहे. शेतकरी, कष्टकरी आज आर्थिक, आरोग्य व अन्य गंभीर समस्यांच्या विळख्यात घट्ट अडकला आहे. देशाला अन्नधान्याने स्वयंपूर्ण करणाऱ्या अपरिहार्यतेतून आधुनिक शेतीचा स्वीकार भारताने केला.

भुकबळीतून आधुनिक शेतीने बऱ्याच प्रमाणात देशाची सुटका झाली, पण भूकबळीपेक्षा कितीतरी अधिक पटीने संकट हरितक्रांतीच्या माध्यमातून ग्रामीण शेती संस्कृतीवर ओढवले. वरील सर्व बाबी पाहिल्या असता आपणांस असे लक्षात येईल की, भारतासह इतर ब्रिटीश वसाहती असणाऱ्या देशांना स्वातंत्र्य मिळाले असले तरी आर्थिक गुलामगिरीचा फास मूठभर बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या माध्यमातून अविरत चालू आहे. जागतिक शांतता, निशस्त्रीकरण, दहशतवाद, भूकबळी हे मुद्दे समोर करून या कंपन्यांनी १९४७ नंतर भांडवली व प्रगत देशाच्या माध्यमातून युद्ध-संघर्ष पेटविले. त्यातून शस्त्रनिर्मितीच्या व्यवसायांना प्रोत्साहन दिले. युद्धानंतर अराजक परिस्थिती निर्माण झालेल्या देशात साथीचा रोग व भूकेच्या संकटाला मानवतेच्या भावनेतून मदत करण्याच्या नावावर पुन्हा आपल्या देशातील उत्पादने त्या त्या देशात खपविण्याचा उद्योग चालू ठेवला आहे.








५

# कोरोना विषाणू विरुद्धचा लढा आणि चौथे महायुद्ध

अमेरिकेने आजपर्यंत जगात केलेल्या लष्करी कारवायांमुळे त्यांच्या देशातील सुज्ञ नागरिकांतून विरोध होत आहे. चीनबरोबरच्या व्यापारी युद्धांमुळे अमेरिकेची आर्थिक स्थिती युद्ध करण्याची राहिली नाही. त्यामुळे चीनबरोबर व्यापारी करार करून औषधी क्षेत्रातील बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या व्यवसायाच्या माध्यमातून सत्ता अबाधित ठेवण्यासाठी जैविक युद्धाचा नवा प्रयोग सुरू करण्यात आला.

जागतिक लोकसंख्या नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत तत्कालीन भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या १९७० च्या कार्यकाळात नसबंदी कार्यक्रम राबविताना देशात अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. फक्त लॉकडाऊनऐवजी कटडाऊन करण्यात आले होते. अनेक अविवाहित तरुणांच्या नसबंदीने या कार्यक्रमाच्या हुकुमशाही वृत्तीने जगात भारताची प्रतिमा मलीन झाली होती. जगात अनेक विषाणूजन्य संसर्गाच्या साथी येऊन गेल्या. तसेच टीबी. एड्स, डेंग्यू, मलेरिया, काविळ इत्यादी संसर्गजन्य रोगांनी जगभरात मरणाऱ्यांची संख्या ही कोरोना विषाणूजन्य रोगाच्या मृतसंख्येपेक्षाही कितीतरी अधिक होती. आजही दरवर्षी विषाणू-जन्य रोगाने जगात १ कोटी ७० लाख लोक मृत्युमूखी पडतात. टीबीने १५ लाख, हीपॅटायटीस १४ लाख, डेंग्यूने २५ हजार ते १ लाख लोक मृत्युमुखी पडतात. प्रसूतीप्रसंगी महिला व बालकांचे मृत्यूचे प्रमाणही काही लाखात आहे. कुपोषण, भूकबळीने जगात किमान ५ ते १० लाख लोक मृत्युमुखी पडतात. जगात कोरोना विषाणूजन्य मृत्यूचे प्रमाण १ ते २ टक्क्याच्या आत असताना जगभरात युद्धजन्य परिस्थिती का निर्माण करण्यात आली. यासाठी काही दिवसांतील जागतिक व्यापार मंदी, आर्थिक मंदी या घडामोडीकडे पाहिल्यास आपणांस कोरोना विषाणूजन्य रोगा विरुद्धचे जागतिक युद्ध लक्षात येईल. जानेवारी २०२० मध्ये दावोसमध्ये जागतिक आर्थिक परिषद झाली. या परिषदेत अब्जाधीश उद्योगपती जॉर्न सोरॉस यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प व भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली. नरेंद्र मोदी हे भारताला हिंदुराष्ट्र करू पाहत आहेत तर ट्रम्प हे आत्मकेंद्री आहेत. ते अर्थव्यवस्थेवर ताण निर्माण करीत आहेत. स्वार्थासाठी राष्ट्रहिताला बळी देण्यास ते मागे - पुढे पाहणार नाहीत. निवडणुका जिंकण्यासाठी ते कोणत्याही थराला जातील.

चीनचे अध्यक्ष शी जिनपींग हे ट्रम्पस यांच्या कमकुवतपणाचा फायदा घेत आहेत. कृत्रीम बुद्धीमतेच्या सहाय्याने जनतेवर ते नियंत्रण ठेवत आहेत. (दि. २५ जानेवारी २०२० दैनिक सकाळ).

उद्योगपती जॉर्नसोरॉर्स यांच्या या वक्तव्यात अर्थ आहे. कारण गेल्या काही वर्षांपासून चीन अमेरिकेच्या व्यापार युद्धाच्या बातम्या येत होत्या. या व्यापार युद्धाअंतर्गत या दोन्ही देशांनी एकमेकांच्या अब्जावधी डॉलर्सच्या वस्तुंवर भरभक्कम शुल्क आकारले होते. यामुळे उभय देशातील संबंधात वितुष्ट निर्माण होऊन जगावरही आर्थिक संकटाचे मळभ ओढावत होते. दरम्यान चीनचा समर्थक देश उत्तर कोरियाचा हुकूमशहा किंम जोंग उन यांच्या आण्विक परीक्षणावर अमेरिकेने युद्धाची भूमिका घेतली होती. कोरिया व अमेरिकेच्या या वाक्युद्धामुळे जगावर युद्धाचे संकट निर्माण झाले होते. पण अचानक अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी १८० अंशाचा यूटर्न घेऊन उभय देशांच्या राष्ट्राध्यक्षांत भेट व चर्चा झाली व हे का? घडले याचे गूढ आजही कायम आहे. चीनमधील हुआन शहरातील कोरोना विषाणूचा उद्रेक डिसेंबर २०१९ मध्ये झाला. या वृत्तासंदर्भात जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात एक वृत्त प्रकाशित झाले आहे. त्यात अमेरिकेतील आरोग्य तज्ज्ञांनी डिसेंबरपूर्वी ३ महिने अगोदरच याबाबत सावधगिरीचा इशारा दिला होता. तसेच अमेरिकेच्या आरोग्य सुरक्षा केंद्राच्या (जॉन्स हॉप किंग केंद्राचे) वैज्ञानिकांनी गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये संशोधनाचा भाग म्हणून एका साथीच्या रोगाचे एक संगणकीय मॉडेल तयार केले होते. त्यानुसार १८ महिन्यांमध्ये या आजारामुळे जगभरातील ६.५ कोटी लोक दगावण्याची भीती व्यक्त करण्यात आली होती. या वृत्तावरून संशोधनाचा भाग असलेले विषाणू प्रत्यक्षात कसे आले? डिसेंबरमध्ये चीनमध्ये झालेल्या कोरोना वृत्तासंदर्भातही आपणांस अजिबात धक्का बसला नाही.

या विषाणूची लागण सहा महिन्यात जगातील प्रत्येक देशात होईल, या विषाणूने संसर्ग झालेले रुग्ण प्रत्येक देशात सापडतील असा इशारा देत कोरोना विषाणूला अद्याप साथीचा रोग म्हणून गृहीत धरण्यात आलेले नाही असे मतही वरिष्ठ संशोधक डॉ. एरिक टोनार यांनी व्यक्त केले. कोरोना विषाणू संसर्गावरून त्यानंतर अमेरिका व चीन यांच्यात बरेचसे वाक्‌युद्धही झाले. चीनमध्ये डिसेंबर २०२० मध्ये या विषाणूचे थैमान चालू असताना हे विषाणू जगभरात पसरत असताना अमेरिकेचे राष्ट्रध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे आपली मुलगी व जावई लवाजम्यासह २४ व २५ फेब्रुवारी २०२० रोजी भारतात येतात त्यांचे शाही पारंपरिक पद्धतीने गुजरात, उत्तर प्रदेश, दिल्लीत स्वागत होते. हजारो लोक या कार्यक्रमासाठी उपस्थित असतात. ट्रम्प यांची मुलगी व जावई यांनी ताजमहालला दिलेल्या भेटीच्या व त्या अनुषंगाने ताजमहलाच्या प्रेम कहाण्या जगभराच्या प्रसारमाध्यमात प्रसारित होतात. जग हे जैविक युद्धाच्या उंबरठ्यावर उभे असताना जगाचे कर्तेधर्ते तारणहार अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प व भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी कसे गाफील राहतात हा मोठा प्रश्न आहे. २१ मार्च २०२० पर्यंत देशात कोरोना विषाणूसंदर्भात फारसे गांभीर्य ठेवण्यात आले नाही, पण नंतर दोन ते तीन दिवसांत केंद्र शासनाने जनता कर्फ्यु व तत्पूर्वी महाराष्ट्र शासनाने दोन दिवसांचा लॉकडाऊन केला. त्यानंतर मात्र भारतीय प्रसारमाध्यमांनी व सोशल मीडियांनी कोरोना विषाणू संसर्गाची भीती व संकटाची तीव्रता दर्शविणाऱ्या वृत्ताचा भडिमार केला. एखाद्या क्रिकेट मॅचचे लाईव्ह प्रक्षेपण करणे किंवा एखाद्या युद्धाचे अथवा निवडणुकीच्या निकालाच्या वृत्ताचे लाईव्ह वृत्तांकन करणे त्या धर्तीवर कोरोना संदर्भाचे वृत्त देण्याचा धडाका सुरू केला. त्या अनुषंगाने केंद्र शासनानेही कोरोना विषाणूचा संसर्ग हा राष्ट्रीय नव्हे तर जागतिक संकट आहे. त्या दृष्टीने आपत्कालीन परिस्थिती घोषित करून अत्यावश्यक सेवा वगळता रेल्वे, विमान, बस आदी सर्व व्यवहार बंद करण्याची घोषणा करून देशात संचारबंदी लागू केली. कोरोना विषाणू हे जगावर न भूतो न भविष्यती असे संकट आहे.

अशी भीती भारतासह जगभरातील नागरिकांत पसरली. त्यामुळे या कोरोना विषाणूसंदर्भात वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींच्या प्रतिक्रिया प्रसिद्ध होऊ लागल्या. इंडो-व्हीयतनाम बोर्डाचे सदस्य असलेले डॉ. बिश्वरूपरॉय चौधरी यांची यूट्युब व एका खाजगी दूरदर्शन वाहिनीवर या कोरोना व्हायरसविषयी अभ्यासपूर्ण वास्तववादी खळबळजनक मुलाखत प्रसिद्ध झाली. या व्हायरससंदर्भात बोलताना डॉ. चौधरी यांनी कोरोनाव्हायरस हा ताप, सर्दी, खोकला या रोगाच्या व्हायरसप्रमाणेच आहे. हा व्हायरस फारसा घातक नसल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. जागतिक स्तरावरील औषधी क्षेत्रातील बड्या बहुराष्ट्रीय कंपन्या, चीन व अमेरिका या सर्वांचे हितसंबंध यातून कोरोना व्हायरसविषयी प्रचंड भीती जगभरात पसरविण्यात आली आहे. गेल्या काही वर्षात औषधी कंपन्यांचा जागतिक व्यवसाय हा ३० पटीने अधिक झाला आहे व या कंपन्यांची वार्षिक उलाढाल ही ३ ट्रिलीयन अमेरिकन डॉलर्स एवढी आहे. त्यामुळे भारतासारख्या देशाचा अर्थसंकल्पही त्यांच्यासमोर छोटा असल्याने या कंपन्यांच्या हितासाठी हे षड्यंत्र रचल्याचा आरोप त्यांनी केला आहे. कोरोना व्हायरसच्या तपासणी किटच्या व्यापारात चीन व अमेरिका या दोन देशांची भागीदारी आहे. कोरोना व्हायरस शोधणाऱ्या किटचे जागतिक मार्केटींग करण्यासाठी हा सर्व खटाटोप करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. जागतिक शक्ती व कंपन्या इतक्या मोठ्या आहेत की, कोणताही सत्ताधारी पक्ष यास विरोध करण्याचे धैर्य दाखवित नाही. याबाबत एक उदाहरण देताना डॉ. चौधरी म्हणाले की १९८४ साली दक्षिण आफ्रिकेत एचआव्ही विषाणूचा शोध लागला. या विषाणूचा झपाट्याने जगात प्रसार झाला. त्यावेळच्या दक्षिण आफ्रिकेच्या राष्ट्राध्यक्षाने एचआयव्ही या विषाणूमुळे एड्स हा रोग होतच नाही असा दावा करून त्याचा विरोध केला. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेत जागतिक महाशक्तीच्या रेट्यावर तेथे सत्ता पालट झाला. एड्स रोगाच्या औषधी निर्मितीत फ्रान्स व अमेरिका हे सहभागी व्यापारी होते.

त्यामुळे दक्षिण आफ्रिका ही या रोगाच्या नाटकाची रंगभूमी होती. एचआयव्ही हा विषाणू जागतिक संकटरूपी खलनायक होता. तर अमेरिका, फ्रान्स या रोगाविरुद्ध लढणारे नायक होते. आज कोरोना जागतिक संकटरूपी खलनायक आहे. चीन ही या नाटकाची रंगभूमी आहे तर चीन व अमेरिका हे या रोगाविरुद्ध लढणारे नायक आहेत असा आरोपही डॉ. चौधरी यांनी केला. तसेच एचआयव्ही विषाणू मानवी शरीरात आजपर्यंत आढळला नाही किंवा आजपर्यंतच्या झालेल्या वैद्यकीय संशोधनातून हे सिद्ध झाले नाही असा दावाही त्यांनी केला. कोरोना व्हायरसच्या उपचारासंदर्भात आपण केंद्रीय आरोग्य मंत्री यांना प्रत्यक्ष भेटून सोप्या पद्धतीने व कमी खर्चाच्या उपचाराबाबत चर्चा केली. पण केंद्रीय आरोग्यमंत्र्यांनी सदर बाब ही जागतिक स्तरावरील असल्याने आपण यात काहीच करू शकत नाहीत असे स्पष्टपणे सांगितले व आपली असाह्यता व हतबलता व्यक्त केली. एका सार्वभौम देशाचे आरोग्य मंत्री जागतिक रेट्यामुळे किती हतबल आहेत हे दिसून येते, असेही डॉ. बिश्वरूप चौधरी प्रतिपादन करतात. याशिवाय सेवाग्राम येथील न्याय वैद्यकीय शास्त्राचे प्राध्यापक यांनीही एका वृत्तपत्रात कोरोनो विषाणू संसर्गाबद्दल सांगितले की, आज कोरोना संदर्भाचे बहुतेक संभाषण फक्त मृत्यूच्या संख्येवर केंद्रित आहेत. त्यामुळे मृत्यूची भीती पसरविण्यात येत आहे. या रोगाबद्दल नाहक भीती बाळगू नये असे आवाहनही त्यांनी केले. ब्रिटनमधील वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्या एका नामांकित संस्थेने जागतिक आरोग्य संघटना (हु) ही वैद्यकीय क्षेत्रातील लुटारू संघटना असल्याचा आरोप काही वर्षापूर्वीच केला असल्याचे डॉ. चौधरी यांनी दुसऱ्या एका मुलाखतीत सांगितले. १ फेब्रुवारी २०१८ च्या अमेरिकेच्या वॉशिंग्टन पोस्ट या अग्रगण्य दैनिकात एक वृत्त प्रकाशित झाले होते. त्यात असे म्हटले आहे की, अमेरिकेतील आरोग्य विभाग संबंधीची संघटना सीडीसी (द सेंट्रल फॉर डिसीज कंट्रोल ॲन्ड प्रिव्हेंशन एजन्सी यूएस) ही संस्था जागतिक पातळीवर व वैद्यकीय सुविधा पुरविण्याच्या नावाखाली प्रचंड पैसा कमावित आहे.

याचे उदाहरण देताना इबोला या विषाणूजन्य संसर्गाचे संक्रमण नियंत्रण व उपचार केंद्र उभारणे, आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे व अतिदक्षता प्रणाली विकसित करून अब्जावधी रुपये कमविण्याचा उद्योग करीत आहे. इबोला प्रभावित ४९ देशांपैकी ३९ देशातून सीडीसी ही संस्था पैसा उकळीत आहे. या उद्योगासाठी लागणारे उपकरण व साहित्यनिर्मिती व औषधांसाठी अमेरिकेच्या करदात्यांकडून सन २०१४ मध्ये ६०० मिलियन डॉलर्स मदत घेण्यात आल्याचेही या वृत्तात म्हटले आहे. सारांश वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी, संस्था ज्यात चीन, ब्रिटन, अमेरिका व भारतासह तज्ज्ञ मंडळी व संस्थेच्या मतांनुसार जागतिक स्तरावर वैद्यकीय सुविधा पुरविण्याच्या नावावर मोठा उद्योग सुरू आहे. कोरोना हे साधारण विषाणू असताना हे जागतिक संकट कसे असू शकते? या विषाणूच्या संसर्गाने जगातील जवळ-जवळ सर्व देशातील व्यवहार कसे ठप्प झाले मनुष्यांना भयभीत करून बंदिस्त कसे करण्यात आले. विषाणू हा हवेतील घटक असून तो सर्वत्र असतो. बंदिस्त घरात त्याचे वास्तव्य असू शकते हे साध्या प्राथमिक स्तरावर शिकणाऱ्या विद्यार्थ्यांलाही कळते. तेव्हा जागतिक संकटामुळे बहुसंख्य देशातील व्यवहार ठप्प ठेवण्यामागे रहस्य काय असा प्रश्न सुज्ञ नागरिकास पडला आहे. याचे रहस्य जागतिक अर्थकारणात दडले आहे. जागतिक व्यापार स्पर्धेत गेल्या काही वर्षांपासून तीव्र स्पर्धा निर्माण झाली. विकासाच्या नावावर आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडून अमेरिका, जपान, चीन यांसारख्या प्रगत राष्ट्रांबरोबरच भारतासारख्या विकसनशील देशांनी मोठ्या प्रमाणावर कर्ज घेतले. कर्ज घेणारे देश व कर्जाची रक्कम डॉलरमध्ये पुढे दिली आहे.

१. अमेरिका - २१ हजार ४६५ (अब्ज डॉलर)
२. जपान - ११ हजार ७८८ (अब्ज डॉलर)
३. चीन - ६ हजार ७६४ (अब्ज डॉलर)
४. इटली - २ हजार ७४४ (अब्ज डॉलर)
५. फ्रान्स - २ हजार ७३६ (अब्ज डॉलर)
६. भारत - १ हजार ८५१ (अब्ज डॉलर)

इतके कर्ज आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडून घेतले आहे. सर्वाधिक कर्ज घेण्याच्या यादीत अमेरिका प्रथम, जपान दुसरा, चीन तिसरा त्यानंतर इटली, फ्रान्स व सहाव्या क्रमांकावर भारत आहे. आंतरराष्ट्रीय बँकेकडून प्रचंड कर्ज घेऊनही विकास व त्या अनुषंगाने त्या त्या देशात रोजगार निर्माण झाला नाही. त्यामुळे जगभरात बेरोजगारीचा प्रश्न मोठ्या प्रमाणामध्ये निर्माण झाला आहे. बेरोजगारीच्या प्रश्नाने त्या त्या देशातील सत्ताधारी चिंतेत आहेत. त्यातूनच जगभरात मूलतत्त्ववादी विचारांनी उचल खाल्ली आहे. त्यातच जागतिक मंदीने उद्योगांना घरघर लागली आहे. अशा परिस्थितीत आर्थिक महासत्तांमध्ये समझोता झाला.  जगातील वाढती बेरोजगारी व इतर ज्वलंत प्रश्नांपासून जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी त्या त्या देशातील सत्ताधाऱ्यांना कोरोना व्हायरसचे जागतिक संकट हे सत्ता टिकविण्यासाठी सोयीचे असल्याने हे जागतिक संकट उभे करण्यात आले ते सत्ताधाऱ्यांच्या अपरिहार्येतून आले आहे. तसेच आगामी काही दिवसांतच अमेरिकेत होऊ घातलेल्या निवडणुकीमध्येही या संकटाचे काही तथ्य दडले आहे. कोरोना विषाणू जागतिक संकट ज्या पद्धतीने उभे करण्यात आले आहे हे अत्यंत चिंतनीय बाब आहे. जगभरातील त्या त्या देशातील शासन, प्रशासन व्यवस्था, प्रसारमाध्यम, साशे ल मीडिया यांनी युद्धभूमिवर ज्याप्रमाणे सैनिकांसमोर संकट उभे राहते त्याच्या कितीतरी अधिक पटीने युद्धभूमीच्यापेक्षाही जास्त दहशत सर्वसामान्य नागरिकांना घरात डांबून निर्माण करण्यात येत आहे. कोरोना संसर्ग झालेल्या व्यक्तीच्या शोधासाठी अवलबं विण्यात येणारी मोहीम, उपचार पद्धती ही अत्यतं विचित्र अमानवीय व भयभीत करणारी आहे.

केवळ कोरोना  विषाणू शोधण्याच्या किटचा प्रचार व्हावा, यासाठी संशयित रुग्णांना पकडून आणण्याची पद्धत ही दहशतवादी शोधण्याच्या पद्धतीप्रमाणचे आहे. या रूग्णांची चाचणी घेण्यासाठी व उपचारासाठी जी उपचार पद्धती वापरण्यात येत आहे. त्यात एड्स व मलेरिया या औषधांचा डोस रूग्णांना देण्यात येत आहे.  या औषधातून रुग्ण बरा न झाल्यास कोणत्याच रोगासाठी तयार न झालेली औषधी या रूग्णांस देण्यात येत आहे व या औषधांची चाचणी या माध्यमातून करण्यात येत आहे. मनुष्यावर एखाद्या औषधीच्या चाचणीचा प्रयोग करण्याची पद्धत ही वैद्यकीय संशोधन संहितेत बसणारी नाही, असा आरोपही डॉ.चौधरी यांनी केला आहे.

विषाणू संसर्ग झाल्याच्या संशयावरून आणलेल्या रूग्णांवर प्रचंड दडपणाने त्यांची प्रकृतीही बिघडत असलेल्याचे वृत्त काही परदेशी वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेले आहे. या शिवाय कोरोना विषाणू शोधणाऱ्या किटच्या विश्वासार्हतेवरही प्रश्न निर्माण होत आहे. या औषधांमुळे या रूग्णांवर दीर्घकालीन गंभीर दुष्परिणाम होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. कोरोनाच्या संकटामुळे जगभरातील लाखो लोकांचे आर–ोग्य धोक्यात आलेले आहे.

समाजातही या रूग्णांकडे पाहण्याचा दृष्टीकोन प्रसारमाध्यमांमुळे बदललेला आहे. शासनाने लॉकडाऊन केल्याने अनेकांचे रोजगार बुडाले, लाखो लोक स्थलांतरीत झाले. या रोगाच्या अनावश्यक भितीच्या प्रसारामुळे रोजगारांसाठी इतर शहरात गेलेल्या लोकांना त्यांच्या मूळगावी येण्यास त्यांच्या नातेवाईकांनी बंदी घातल्याचे वृत्त आहे. त्यामुळे नवा सामाजिक प्रश्नही निर्माण झालेला आहे. अनेक शहरात मोहल्लावाईज बंदीचे बोर्ड ठिकठिकाणी लावण्यात आल्याने हा प्रश्न अत्यंत जटील होत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. खाजगीकरणाने व मुक्त अर्थव्यवस्थेने राष्ट्र ही संकल्पना क्षीण झाली आहे. प्रत्येक देशातील सत्ताधीश हे मुठभर भांडवलदार व उद्योगपतींचे हीत जपण्यात गुंतले आहेत.

कोरोनारूपी चौथे जैविक युद्ध हे जगभरातील शेतकरी, कष्टकरी, उपेक्षित, असंघटित कामगारांच्या मुळावर आले आहे. या जैविक युद्धात आर्थिक शोषणाबरोबर बेरोजगारी व आरोग्याचा गंभीर प्रश्न या वर्गासमोर निर्माण होणार आहे. विज्ञानाच्या संशोधनातून निर्माण झालेल्या साधनांचा, तंत्रज्ञानाचा वापर धर्मापेक्षाही विखारी पद्धतीने करून गुलामीची नवीन शोषण व्यवस्था निर्माण होऊ पाहत आहे. या युद्धात विज्ञान तंत्रज्ञानाचा वापर अत्यंत चुकीच्या पद्धतीने करण्यात येत आहे. शासनव्यवस्था, प्रसारमाध्यमे व इंटरनेट प्रणाली ही या नवीन युद्धाची अस्त्रे आहेत. काल्पनिक शत्रू संकट उभे करून प्रत्यक्ष धार्मिक शोषण व्यवस्थेला लाजवेल अशी व्यवस्था मूठभर भांडवलदार व उद्योगांना जगविण्यासाठी निर्माण करण्यात येत आहे. सॉक्रेटीस या तत्त्ववेत्याने आपले तत्त्वज्ञान तत्कालीन धर्म व प्रस्थापित राज्यव्यवस्थेविरुद्ध मांडून त्या विचारावर ठाम राहण्याचा निर्णय घेऊन विषाचा प्याला घेण्याचा मार्ग अवलंबला. गॅलिलीओने सूर्य पृथ्वीभोवती नाही तर पृथ्वी सूर्याभोवती फिरते हे वैज्ञानिक संशोधन सत्य मांडून मृत्युदंडाच्या शिक्षेला न जुमानता आपल्या संशोधनावर ठाम राहिले. पूर्वी धर्म व राज्यसत्तेच्या विरुद्ध विज्ञान होते. आज बाजारू व भांडवली विज्ञानाच्या विरुद्ध शोषितांसाठी असणाऱ्या खऱ्या विज्ञानाचा लढा उभा राहणार आहे. त्यामुळे सॉक्रेटीससारखे तत्त्ववेत्ते व गॅलिलीओ सारखे वैज्ञानिकांची कधी नव्हे ते या विज्ञान युगात गरज निर्माण झाली आहे.









६

# भारतावरील परकीय आक्रमणे, कोरोना युद्ध व हिंदवी स्वराज्य

वैदिकेत्तर कालखंडात भारतातील चातुर्वर्ण्य व्यवस्था जन्मावर आधारित होती. कनिष्ठ दर्जाचे काम करणाऱ्या जाती समूहास अस्पृश्य मानल्या गेले जनावरांचे मांस, मानवी मल व कातडी वहन व इतर व्यवसाय करणाऱ्या जाती समूहास यामुळे अस्पृश्यता, शिवाशीव या प्रकाराचा सामना करावा लागला. शिवाशीव भारतीय समाजात अस्तित्वात आल्याने समाजामध्ये मोठ्या प्रमाणात दुही निर्माण झाली.

भारतीय समाजातील ही दुही विदेशी आक्रमणास कारणीभूत ठरली. भारताच्या इतिहासात केवळ छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांनी ही हजारो वर्षाची शिवाशिव प्रथा मोडीत काढली. शस्त्र चालविण्याचा अधिकार जातविरहित सक्षम योग्य व्यक्तीच्या हाती दिल्याने हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली. राजाविना स्वराज्य हे सुमारे दीडशे वर्षे टिकले हे जगातील एकमेव उदाहरण आहे. पेशवाईच्या उत्तरार्धात चातुर्वर्ण्य व्यवस्था पुन्हा अस्तित्वात आणण्याचा प्रयत्न झाला.परिणामी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्यावर भिमा – कोरेगाव येथील युद्धानंतर युनियन जॅकचा झेंडा स्वराज्यावर फडकला. भारताच्या विदेशी गुलामगिरीस कारणीभूत ठरलेल्या समाजव्यवस्थेचे पुनर्निर्माण केल्याने भारतीय इतिहासातील स्वदेशी हिंदवी स्वराज्याचा अस्त झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी भारतीय गुलामगिरीचा अभ्यास करून मोठ्या चातुर्याने हिंदू धर्म व या धर्माच्या व्यवस्थेचा राज्य स्थापनेसाठी चाणाक्षपद्धतीने वापर केला. हिंदवी स्वराज्याची स्थापना म्हणजे समाजातील सर्व समाज घटकांना समान हिस्सा व परदेशी आक्रमणासाठी सक्षम असलेल्या सर्व समाज घटकांना युद्ध लढण्याचा अधिकार हा त्यांनी दिला. त्यातून हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली. पर्यावरणाने संपन्न असलेला भारत हा प्राचीन देश आहे. भारतातील समृद्धता हा जगातील आकर्षणाचा केंद्र पूर्वीपासूनच राहिली आहे. व्यापारानिमित्त आलेल्या परदेशी व्यापाऱ्यांनी भारतातील समृद्धीचे वर्णन त्या – त्या देशात केल्याने संपत्तीच्या मोहापोटी भारतावर सातत्याने विदेशी आक्रमणे झाली. भारतावर हजारो वर्ष विदेशी सत्तेचेच अधिराज्य राहिले आहे. केवळ आर्थिक सुबत्ता हे परदेशी आक्रमणास कारणीभूत ठरली नाही. भारतीय समाजातील मोठ्या प्रमाणात असलेली सामाजिक, आर्थिक दरी ही देशावर विदेशी सत्ता स्थापनेस कारणीभूत ठरली. अनेक परदेशी टोळ्यांनी भारताच्या विविध भू–प्रदेशावर राज्य केले.

वैदिकपूर्व काळ हा भारताचा सुवर्ण काळ होता. या काळातील समाजव्यवस्था कर्मावर आधारित होती. व्यक्तीच्या कार्यक्षमतेवर वर्ण अस्तित्वात आले. चातुर्वर्ण्य व्यवस्था ही आर्यपूर्वच असून आर्यांच्या आक्रमणानंतर चातुवर्ण्य व्यवस्था जन्मावर आधारित झाली आणि त्यानंतरच भारतीयांवर परदेशी आक्रमणे वाढू लागली. शत्रुंची आक्रमणे परतवण्यास समाजातील सक्षम असणाऱ्या वर्गास शस्त्र चालविण्याचा (युद्ध लढण्याचा) अधिकार नाकारण्यात आला. केवळ विशिष्ट समाजाचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी हे करण्यात आले. त्यामुळे समाजातील दुही ही आधुनिक शस्त्राने सज्ज असणाऱ्या व ध्येयाने प्रेरित असणाऱ्या परदेशी आक्रमणासमोर टिकू शकली नाही. युद्ध प्रसंगी एक मोठा समुदाय ज्यांच्याकडे युद्ध लढण्याची क्षमता होती त्यांचे अधिकार काढल्याने भारतीयांवर विदेशी सत्तेचे राज्य प्रस्थापित झाले. युद्ध हे समाजाच्या सर्व घटकाच्या सहभाग व आत्मप्रेरणेने जिंकल्या जाते हा युद्धाचा इतिहास सांगतो. कोरोना संकट/ युद्ध सध्या लढल्या जात आहे. भारतातील १३० कोटी जनता हे युद्ध लढत आहे. पण या युद्धात सहभागी असणाऱ्या कोट्यावधी श्रमिक व कष्टकऱ्यांनी आपल्या श्रमाने देशात आर्थिक समृद्धता आणली. त्यांचे शस्त्र (रोजगाराचा अधिकार) हिसकावण्यात आले. त्यामुळे या युद्धाचे परिणाम काय असतील हे आताच दिसून येत आहेत. कोरोना संकटाचा सामना करण्यासाठी भारतीय लोकशाहीतील जे महत्त्वपूर्ण चार स्तंभ आहेत, त्यातील राज्यकर्ते, नोकरशाह, न्याय यंत्रणा व प्रसार माध्यम यांची या युद्धात महत्त्वाची भूमिका होती. परंतु या चारही स्तंभांनी आपल्या गुलामगिरीच्या इतिहासातून काहीच बोध घेतला नाही. कोरोना संकटात/युद्धात खऱ्या अर्थाने सहभागी असणाऱ्या या श्रमिक वर्गाकडे स्थलांतरीत (पलायन) कामगारांच्या भीषण परिस्थितीकडे अक्षम्य दुर्लक्ष करण्यात आले. उद्योगपतींनी या युद्धाबाबत अनभिज्ञता दाखविली.

नोकरशाहींनी राज्यकर्त्यांची हुजरेगिरी करण्यात धन्यता मानली. तर न्यायपालिकेने याकडे सावधतेने कानाडोळा केला. प्रसार माध्यमाने अतिरेक केला. यामुळे कोरोना संकट व त्यानंतरची देशाची परिस्थिती ही विदेशी गुलामगिरीच्या कासाला अधिक बळकटी देणारी ठरणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक प्रसंगीच्या छायाचित्रातून सध्याच्या कोरोना संकटाच्या अनुषंगाने विदेशी कंपन्यांचा वावर कसा वाढणार आहे हे दर्शविणारे ते छायाचित्र आहे. त्या छायाचित्रात एक गोरा व्यक्ती महाराजांच्या जवळ दिसतो तो महाराजांना मुजरा करीत होता. इतिहासकाराच्या मते तो गोरा मनुष्य इंग्रज होता. स्वराज्यात व्यापारासाठी तो महाराजांकडे परवानगी मागण्यासाठी राज्याभिषेक सोहळ्यास आवर्जून उपस्थित होता. ६ जून १६७४ रोजी राज्याभिषेक प्रसंगी व्यापारासाठी छत्रपती शिवाजी महाराजांना मुजरा करणारा गोरा व्यक्ती स्वराज्याच्या स्थापनेच्या दीडशे वर्षानंतर भिमा – कोरेगावच्या युद्धानंतर व्यापाराच्या माध्यमातून छत्रपतींना मुजरा करणारे हे व्यापारी राज्यकर्ते झाले. असा हा इंग्रजाचा व्यापारी ते राज्यकर्ते असा प्रवास आहे. आज स्थितीस या गोऱ्या मनुष्याची जागा काळ्यांनी (राज्यकर्ते) घेतली. फक्त फरक एवढाच! गोऱ्या व्यक्तींनी आपल्या देशासाठी व व्यापारासाठी हे केले तर काळे व्यक्ती हे केवळ आपल्या अस्तित्वासाठी युनियन जॅकसारख्या असंख्य विदेशी कंपन्यांचे झेंडे देशात फडकू पाहात आहेत. आर्यांनी निर्माण केलेली जन्मावर आधारित चातुर्वर्ण्य व्यवस्था ही कोरोना संकटानिमित्त आत्मनिर्भरतेच्या नावावर देशात समृद्धी आणणाऱ्या श्रमिक वर्गाला नव्या जागतिक व्यवस्थेत कोरोना संसर्गाच्या नावाखाली पुन्हा नव्याने अस्पृश्यता व शिवाशीव या व्यवस्थेकडे ढकलत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा सोहळा हा आधुनिक लोकशाही व मानवी प्रतिष्ठेचा गुणगौरवाचा समारंभ होता. शोषणविरहित, धर्मविरहित आधुनिक राष्ट्रनिर्माणाची संकल्पना राज्याभिषेकाच्या सोहळ्याच्या माध्यमातून जगाला देण्यात आली.

छत्रपतींच्या राज्याभिषेक सोहळ्याप्रसंगी उपस्थित असलेला गोरा व्यक्ती व सध्या देशातील परिस्थिती पाहिल्यास परदेशी यवनांचा (शक्तींचा) सामना करत लाखो लोकांनी बलिदान दिलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या नावावर स्वातंत्र्यानंतर देशात निर्माण झालेल्या संरक्षण क्षेत्रापासून अनेक नामांकित सार्वजनिक क्षेत्रांचा खाजगीकरणाचा घाट घातल्या जात आहे. देशातील सार्वजनिक व्यवस्था बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी आंदण खुले करून देशाला नव्या गुलामगिरीत लोटण्याची राज्यकर्त्यांची ही कृती अत्यंत दुर्देवी आहे.








७

# कोरोना संकट व गोंधळलेले सरकार



इतिहासाचे अभ्यासक असे सांगतात की, जगात भांडवल हे काही काटकसर करून आणि कष्टाने उभे राहत नाही. जगात भांडवली व्यवस्था लुटमारीतून अस्तित्वात आली आहे. जगाच्या इतिहासात युरोपियन राष्ट्रांनी भांडवली अर्थव्यवस्था पराभूत देशाच्या लुटीतून निर्माण केली व भांडवल संचयासाठी आपापसात युद्ध केले हा जगाचा इतिहास आहे. ब्रिटिशांनी व्यापाराच्या माध्यमातून भारतावर सत्ता स्थापन केली.

ब्रिटिशांची भारतावरील सत्ता स्थापन हा लुटमारीचा प्रकार होता. एका आगपेटीच्या डबीत नऊवारी साडी बसेल इतकी तलमता मलमलच्या कापडात होती. ह्या मलमलीच्या साड्या तयार करणाऱ्या ढाक्यातील कारागिरांची बोटे इंग्रजांनी छाटली व कापडाचा उद्योग बंद केला. इंग्लंडमधील यंत्रातून निर्माण होणारे मँचेस्टर कापड भारतात आणून विकण्याचे अघोरी व्यापारतंत्र वापरले. त्यातून ब्रिटिशांची सत्ता भारतात स्थापन झाली. भारतीय गुलामगिरीचा इतिहास पाहिल्यावर राजेशाही राज्य संस्थेतील कारभार पाहणारी यंत्रणा ही (प्रशासकीय) भारतीयांना विदेशी शक्तीचे गुलाम ठेवण्यास प्रमुख कारण ठरली आहे. आपल्याच राज्यातील कमकुवत समाजाला चिरडणे व आपल्यापेक्षा शक्तिशाली विदेशी सत्तेसमोर लोटांगण घालून आपले अस्तित्व कायम ठेवणे ही फितुरीची हजारो वर्षांची परंपरा कायम आहे. आज कोरोना संसर्गाच्या जागतिक महायुद्धातही भारतीय प्रशासनाची हीच मानसिकता प्रकर्षाने दिसून येते. प्रशासनाच्या मानसिकतेपेक्षा स्वदेशी व भारतीय संस्कृतीचा अभिमान बाळगणारी सत्ताधारी पक्षाची आपल्या विचारसरणीची ही विसंगत कृती व हतबलता ही देशासाठी मोठी चिंतेची बाब आहे. केंद्रातील भारतीय जनता पार्टीच्या मातृत्व संघटनेचा स्वातंत्र्यपूर्व काळापासून पाश्चात्य तत्त्वज्ञानावर आधारित काँग्रेसच्या स्वातंत्र्य चळवळीस विरोध होता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची हिंदू संस्कृतीवर श्रद्धा नव्हे, तर भारत हा हिंदुराष्ट्र करण्याचा छुपा अजेंडा आहे, असे विरोधकांचे म्हणणे असते. एक शक्तिशाली राष्ट्र उभारण्यासाठी भारतीय तत्त्वज्ञानाची आवश्यकता आहे, अशी धारणाही संघाची आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व त्यांच्या संलग्न संघटना यांचा नेहमीच पाश्चात्त्य संस्कृती व त्यांच्या जीवनपद्धतीला विरोध असतो. भारतीयांना संस्कृती, प्राचीन आयुर्वेद चिकित्सा पद्धती याबाबत कमालीचा अभिमान आहे.

कोरोना विषाणू संसर्ग हे जागतिक युद्ध आहे. आरोग्य व वैद्यकीय क्षेत्राशी निगडित आहे. पण या युद्धाचे परिणाम देश व जगातील सर्व क्षेत्रात न भुतो न भविष्यती होत आहेत. अशा परिस्थितीत आयुर्वेदाची भूमिका महत्त्वाची असायला पाहिजे. भारतीय जनता पक्षाच्या कार्यकाळात म्हणजेच नरेंद्र मोदी सरकारच्या काळातच योग विद्येला जागतिक दर्जा प्राप्त झाला. जागतिक आरोग्य संघटनेनेही योग दिनाची घोषणा केली व सन २०१५ पासून २१ जून हा जागतिक योग दिन म्हणून जगभरात साजरा होतो. भारतात योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. पंतप्रधानांपासून, मंत्री महोदय, सर्व शासकीय कार्यालयात, देशातील सर्व शाळा, महाविद्यालयांत योग दिनानिमित्त भारतीय आयुर्वेदाचे महत्त्व सांगितले जाते. योग गुरू रामदेव बाबा नेहमीच ॲलोपॅथी उपचार पद्धतीवर टीका करतात व शुगर, रक्तदाब रोगाच्या नावाखाली विदेशी कंपन्या भारतातून कोट्यवधी रुपयांची लूट करतात असा त्यांचा आरोप असतो. रक्तदाब व शुगर या आजारावर आयुर्वेदात विनाखर्च उपचार उपलब्ध आहे. जिथे ॲलोपॅथिक उपचार पद्धती हात टेकते तेथून आयुर्वेद उपचार पद्धती सुरू होते. असे रामदेव बाबा मानतात पण देशासमोर कोरोना जागतिक संकट असताना ते आयुर्वेदाचार्य मौन बाळगतात. शासनही कोरोनासाठी फक्त ॲलोपॅथिक उपचार पद्धतीला मान्यता देते व शासनाचा निर्णय न्यायालयही कायम ठेवते, कोणतेही वैज्ञानिक कारण नसताना ॲलोपॅथिक वगळता इतर वैद्यकीय उपचार पद्धतीस कोरोना रुग्णावर उपचार करण्यास न्यायालय प्रतिबंध घालते ही आश्चर्याची बाब आहे. कोरोना विषाणूचा संसर्ग यावर जगभरातील वैद्यकीय क्षेत्रातील, राजकीय व विचारवंत मंडळींनी आधीपासूनच संशय निर्माण केला होता. हा संसर्ग रोखण्यासाठी जगातील अनेक देशांनी लॉकडाऊन न करता ते कोरोना संसर्ग रोखण्यात यशस्वी झाले.


भारतातील नामवंत वैद्यकीय तज्ज्ञ व जागतिक स्तरावर आपल्या स्वतंत्र उपचार पद्धतीने प्रसिद्ध असलेले डॉक्टर विश्वरूप राय चौधरी यांनी कोरोना रुग्ण अल्प खर्चात बरा करण्याचा दावा केला. त्या अनुषंगाने केंद्रीय आरोग्यमंत्री यांच्याशी प्रत्यक्ष भेट घेऊन प्रस्ताव सादर केला होता. पण सदर बाबी ही जागतिक स्तरावरची असल्याने ती नाकारण्यात आली. वैद्यकीय क्षेत्रामध्ये जागतिक स्तरावर वाढलेला अब्जावधी डॉलरचा व्यवसाय व चीन – अमेरिका यांच्यातील व्यापार युद्ध व त्यांच्यातील समझोत्यातून कोरोना व्हायरसचे संकट उभे करण्यात आले आहे. तसेच कोरोना नावाखाली मानवाचा ह्यूमन गिनिपिग म्हणून होत असलेला वापर यावर डॉ. चौधरी यांनी एका खाजगी वृत्तवाहिनीस व कोरोनावर लिहिलेल्या पुस्तकातून गंभीर आरोप केले आहेत. चौधरी यांनी कोरोना रुग्णांवर उपचार करण्यासाठी शासनाकडे परवानगी मागितली होती ती नाकारण्यात आली. याउलट लॉकडाऊनच्या काळात मद्य दुकाने उघडण्याची मागणी कोणीही केली नसताना शासनाने ही दुकाने उघडण्यास परवानगी दिली. शासनाच्या भूमिकेमुळे खरोखरच कोरोना संसर्गाविषयी शासन गंभीर आहे का? हा प्रश्न उपस्थित होतो. जागतिक साथीच्या प्रकोप काळात शासनाच्या या असंवेदनशील निर्णयाकडे न्यायालयही आपल्या डोळ्यावर पट्टी बांधते ही अनाकलनीय बाब आहे. जनता कर्फ्यू व लॉकडाऊन ही घोषणा करताना देशातील लोकांचे प्राण महत्त्वाचे सांगितले होते. पण लॉकडाऊन त्या अनुषंगाने शासनस्तरावर केलेल्या आजपर्यंतच्या उपयोजनाकडे पाहिले असता खरोखरच कोरोना देशासमोरील संकट आहे का? याविषयी शंका निर्माण होते. सामाजिक अंतर पाळा, मानवी संचारावर बंदी, लोकांना घरात डांबून ठेवणे, मास्क वापरणे हा संसर्ग रोखण्याचा एकमेव मार्ग आहे अन्यथा लाखो लोकांचा मृत्यू अटळ असे भय देशासमोर उभे केले, पण प्रत्यक्षात मात्र सर्व नियमांत विसंगत कार्य झाले.

लॉकडाऊन कार्यकाळात काही राजकीय मंडळींनी त्यांच्या मुला-मुलींचे लग्न कोणतेच नियम न पाळता पार पडले. अनेक राजकीय व्यक्तींच्या पार्ट्या रंगल्या. सर्वसामान्य जनतेने नियम पाळले, टाळेबंदी काळामध्ये पोलिसांचे दंडे खाल्ले, या कार्यकाळात लाखो लोकांवर गुन्हे दाखल झाले, पण शासनाकडून श्रमिकांसाठी उभारण्यात आलेल्या निवारास्थळी सामाजिक अंतराचे नियम पाळ-ले गेले नाहीत. स्थलांतरित मजुरांसाठी सोडण्यात आलेल्या श्रमिक रेल्वेमध्येही सामाजिक अंतराची ऐसी की तैसी झाली. दारूची दुकाने उघडल्यानंतर सामाजिक अंतराचे काय झाले हे सर्व देशाने पाहिले. वातानुकुलितने कोरोनाच्या संसर्गाचा प्रसार अधिक वाढतो तर मग वातानुकुलित रेल्वे गाड्या का सोडण्यात आल्या? इतकेच काय रुग्णांच्या उपचारासाठी असणाऱ्या रुग्णालयातही मोठ्या प्रमाणामध्ये गैरसोय होती. कोरोना रुग्ण शोधणे, त्यावरील उपचार पद्धती ही आधुनिक तंत्रज्ञानाच्या ऐवजी रानटी आहे व पोलीस जसे गुन्हेगारांना पकडून गुन्ह्याचा तपास करतात त्या पद्धतीची आहे. दहशतवादी शोधणे कामी पोलीस तपास यंत्रणा चालवतात त्याच धर्तीवर कोरोना रुग्ण शोधण्यासाठी डॉक्टरांच्या अगोदर पोलीस दाखल होतात. लागलीच रुग्ण आढळलेला परिसर सील करण्यात येतो. त्यानंतर रुग्ण कुणाकुणाला भेटला त्या व्यक्तींनाही ताब्यात घेण्यात येते. रुग्णाला तपासणाऱ्या डॉक्टर मंडळींचा गणवेशही बॉम्बशोधक पोलीस पथकासारखा असतो. प्रसारमाध्यमांनी कोरोनाबाबत अतिरेकी प्रचार केल्याने त्या रुग्णास कुटुंबही स्वीकारण्यास नकार देते. वैद्यकीय क्षेत्राच्या इतिहासात एखाद्या रुग्णाविषयी इतकी दहशत प्रथमच पहायला मिळते आहे. जगभरात कोरोना युद्धाचे काय परिणाम होतील ते काळ ठरवेल. परंतु विदेशी आक्रमणाचा भारतीय इतिहास पहिला, तर हजारो वर्षांपासून देशावर विदेशी आक्रमणे झाली या आक्रमणात या ठिकाणची धार्मिक केंद्रे, ज्ञान केंद्रे उद्‌ध्वस्त झाली. यातील मूर्ती व शिल्प भंगली, पण मंदिरातील व ध्यान केंद्रातील पुजारी मात्र कायम राहिले.



भारतातील राजेशाही नष्ट झाली, पण राजेशाही चालवणारी व्यवस्था मात्र कायम राहिली. जागतिकीकरणाच्या नव्या व्यवस्थेतही ही व्यवस्था (प्रशासन) कायम आहे. जागतिक कोरोना युद्धाच्या नावाखाली देशातील सामान्य जनतेच्या चालवलेल्या लुटीत आमचा हिस्सा कायम ठेवा हीच कोरोना युद्ध व त्यानंतरची ही वस्तुस्थिती आहे.





८

# उद्योगपतींच्या संपत्तीवरही सिलिंग ॲक्ट लावण्याची गरज

काँग्रेसच्या स्वातंत्र्य चळवळीत महात्मा गांधींचे युग प्रारंभ झाल्यानंतर स्वातंत्र्याची चळवळ ही अधिक व्यापक झाली. इंग्रजांना सत्तेतून हाकालणे एवढ्यापुरतीच गांधींची चळवळ मर्यादित नव्हती. ग्रामस्वराज्य ही संकल्पना हिंद स्वराज्य या पुस्तकाच्या माध्यमातून गांधींनी जनतेसमोर ठेवली होती. शेवटच्या व्यक्तीला समान हिस्सा हा स्वातंत्र्याचा मूळ गाभा होता.

महात्मा गांधींच्या लढ्याने १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. १९४८ मध्ये गांधींची हत्या झाली. स्वराज्यातील हिंद शब्द गायब झाला. स्वातंत्र्यानंतर आपण समाजवाद स्वीकारला. पण देशातील शेवटचा व्यक्ती स्वातंत्र्यानंतरही अन्नाविना भुकेकंगाल होता. आचार्य विनोबा भावे यांच्या नेतृत्वाखाली भूदान चळवळीचा उदय झाला. देशातील लाखो भूमिहिनांना बड्या जमीनदारांच्या जमिनींचा काही हिस्सा दान देण्यास प्रवृत्त करण्यात आले. पुढे शासनानेही किमान जमीनधारणा कायदा (सिलींग ॲक्ट) अस्तित्वात आणला. भूदान चळवळ व सिलिंग ॲक्टमुळे देशातील लाखो भूमिहिनांना रोजगार मिळाला व त्यांचा पोटाचा प्रश्न कायमचा सुटला. आज कोरोना विषाणू विरुद्धच्या जागतिक महायुद्धामुळे देशातील इतिहासात कधी नव्हे इतके बेरोजगारीचे संकट उभे राहिले आहे. अशा प्रसंगी देशाला संकटातून बाहेर काढण्यासाठी श्रीमंत लोकांना तात्पुरता जादा कर आकारणीची शिफारस केंद्रीय महसूल अधिकारी मंडळांनी केली. शासनाने ही शिफारस फेटाळून लावली. पण, याउपरही शिफारस करणाऱ्या सनदी महसूल अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई केली. राष्ट्रीय संकटाच्या काळी सरकार बड्या उद्योजकांच्या हितसंबंधाला धक्का लावत नसेल तर या उद्योगपतींच्या संपतीवर सिलिंग कायदा लावणे हे दूरच राहिले. सरकारच्या या कृतीने कोरोना संकटानंतर इंडिया व भारत यांच्यातील दरी आणखीन रुंदवण्याची भीती निर्माण झाली आहे.

कोरोनाविरुद्ध लढण्यासाठी २४ मार्चला देशात टाळेबंदीची घोषणा करण्यात आली. कोरोनाविरुद्ध लढण्यासाठी भारतीयांचे मनोबल वाढविण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला वेळोवेळी संबोधित केले. कोरोनाविरुद्धचे युद्ध जनताच जनतेच्या नेतृत्वाखाली लढत आहे. स्वावलंबी व्यक्ती, स्वावलंबी खेडे व त्याग या तत्त्वाचे डोस देशवासीयांना पाजून हे युद्ध दीर्घकालीन असून, जनतेने त्यागाची भूमिका घ्यावी असे आवाहन केले.

पण या युद्धात खऱ्या अर्थाने सर्वस्व गमावलेल्या कामगार, मजूर, कष्टकरी व असंघटित वर्ग व किरकोळ व्यावसायिक यांच्या उदरनिर्वाहाच्या संदर्भात तात्पुरत्या किंवा दीर्घकालीन उपाययोजनेबाबत कोणताही चकार शब्दही काढण्यात आलेला नाही. दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने हिरोशिमा व नागासकी या शहरांवर अणुबॉम्ब टाकून जपान बेचिराख केला होता. महायुद्धात उद्ध्वस्त झालेल्या जपानने नंतर कशी प्रगती केली, हे जगाने पाहिले आहे. राष्ट्रप्रेमाने भारावलेल्या जपानच्या जनतेने महायुद्धानंतर आपल्याकडील जादा जमीन इतर गरजू भूमिहिनांना दान दिली. त्यातूनच फिनिक्स पक्षाप्रमाणे जपान उभा राहिला.

इंग्रजी सत्तेविरुद्ध भारताचा लढा सन १८५७ पासून सुरू झाला. पण भारतीयांना इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी ९० वर्षांचा संघर्ष करावा लागला. कोणतीही चळवळ ही जनतेची होत नाही तोपर्यंत त्याला मूर्त स्वरूप येत नाही. काँग्रेसची स्वातंत्र्याची चळवळ महात्मा गांधींनी देशाच्या शेवटच्या व्यक्तीपर्यंत नेवून ठेवली होती. गांधी हे स्वातंत्र्यासाठी महान योद्धा बरोबरच स्वातंत्र्यानंतर देशाची राजकीय व्यवस्था कशी असेल याबाबत ते अत्यंत गंभीर होते. सन १९०९ मध्ये 'अन्टो धिस लास्ट' या पुस्तकाचे भारतीय भाषेत अनुवाद करून स्वातंत्र्याचा अर्थ त्यांनी भारतीयांना समजून सांगितला. अहिंसेचे, सत्याग्रहाचे महत्त्व लोकांच्या हृदयात बिंबवले. तेंव्हा लोक विनाशस्त्र लढले. हजारो लोकांनी देशासाठी बलिदान दिले. तेंव्हा कुठे देश स्वतंत्र झाला. स्वातंत्र्य दृष्टीक्षेपात असताना ईस १९४५ मध्ये महात्मा गांधींना लिहिलेल्या पत्रात पंडित जवाहरलाल नेहरूंनी लिहिले होते की, 'मी हिंद स्वराज्य खूप वर्षांपूर्वी वाचले होते आणि आता मला त्याची अस्पष्टता आठवत आहे. ते वाचत असतानाही मी अव्यवहार्य मानले आणि आता देखील मला तेच वाटते' पुढे सन १९४८ मध्ये महात्मा गांधी यांची हत्या झाली. स्वराज्य मिळाले. परंतु गांधींच्या स्वप्नातील हिंद स्वराज्य दुभंगले. देश स्वातंत्र्य झाल्यानंतरही देशातील अर्थव्यवस्था ही कृषीवर अवबलूंन होती.

औद्योगिकरणाचा विकास झाला नव्हता. स्वातंत्र्य मिळूनही देशातील भुकेचा प्रश्न गंभीर होता. त्यामुळे आचार्य विनोबा भावे यांनी १८ एप्रिल १९५१ रोजी भूदान चळवळ सुरू केली. या चळवळीचे प्रमुख उद्दीष्टे संतुलित आर्थिक वितरण व समतेवर आधारित व्यवस्था निर्माण करणे. सत्तेबरोबरच आर्थिक शक्तीचे विकेंद्रीकरण, प्रत्येकाचा जमीन व मालमत्तेवर समान हक्क हा होता. देशातील जमीनदारांच्या जादा जमिनींपैकी काही हिस्सा भूमिहिनांना देऊन त्यांचा भुकेचा व रोजगाराचा प्रश्न सोडविण्यासाठी एक सृजनशील भूदान चळवळ केली होती. या चळवळीमुळे जमीनदार वर्गात दातृत्वाची भावना निर्माण झाली. २५ लाख एकरपेक्षा अधिक जमीन दान करून सुमारे ५० दशलक्ष भूमिहिनांना या चळवळीचा लाभ झाला. या ठिकाणी काही जमीनदार, संस्थानिकांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागतो. राजा बहादूर गिरीवार नारायणसिंग (झारखंड), राकांचा राजा (गढवाल) व इतरांनी तब्बल १ लाख २ हजार एकर, मीर उस्मान अलिखान (हैद्राबाद) यांनी १ हजार ४०० एकर व वेंद्रे रामचंद्र रेड्डी (तेलगंणा) यांनी ५० एकर जमीन दान केली. यावरून या चळवळीचे महत्त्व लक्षात येते.

## देशाच्या संकटकाळी सिलिंग ॲक्टप्रमाणे उद्योगपतींच्या संपत्तीवरही मर्यादा लागू करण्याचे धाडस करण्याची गरज...

स्वातंत्र्यानंतर प्रथम अभूतपूर्व संकट देशासमोर उभे राहिले आहे. लॉकडाऊनमुळे साऱ्या देशातील व्यवहार ठप्प झाले आहेत. महाराष्ट्रातील सुमारे २ कोटी तर देशातील ५० कोटी लोकांच्या रोजगारावर गंडांतर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. देशातील सुमारे ६० ते ७० कोटी कुटुंब सद्य परिस्थितीत अर्धपोटी जीवन जगत आहेत. भविष्यात रोजगाराच्या चिंतेनेही देश ग्रासला आहे. देशाची आर्थिक परिस्थिती बिकट झाली आहे. आर्थिक संकटातून मार्ग काढण्यासाठी सरकारने केंद्रीय महसूल मंडळाकडून उपाययोजनांसाठी अहवाल मागविला होता.

महसूल मंडळाने देशाला संकटातून बाहेर काढण्यासाठी काही उपाययोजना सूचविल्या होत्या. त्यात १ कोटी व त्यापेक्षा अधिक उत्पन्न असणाऱ्या श्रीमंत वर्गाकडून ४० टक्के कर आकारणी, ५ कोटी संपत्ती असलेल्या व्यक्तीसाठी संपत्ती पुनरनिर्मितीचा प्रस्ताव तसेच १० लाख रुपये उत्पन्न असणाऱ्या व्यक्तीकडून कोविड उपचारास काही उपाययोजनेची शिफारस करण्यात आली होती. अर्थ संकटातून देशाला लवकर बाहेर काढण्यासाठी श्रीमंत लोकांकडून तात्पुरत्या स्वरुपात जादा कर आकारणे हे सर्वात उत्तम मार्ग असल्याचे मत हे युरोपियन अर्थतज्ज्ञांनीही व्यक्त केले होते. हा अहवाल स्वीकारावा अथवा फेटाळावा हा सरकारच्या अधिकारक्षेत्रातील बाब आहे. पण महसूल मंडळाचा अहवाल बाहेर येताच काही तांत्रिक बाबी समोर करून सनदी महसूल अधिकारी प्रशांत भूषण, प्रकाश दुबे व संजय बहादुरे यांच्या विरुद्ध तत्काळ निलंबनाची कार्यवाही करण्यात आली. सद्यस्थितीत विचार केल्यास महसूल मंडळाचा हा अहवाल देशाच्या हितार्थच होता. देशाच्या हितासाठी कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध निलंबनाची कार्यवाही होते. तर या उलट लॉकडाऊनच्या काळात गुन्हेगारांना कायद्याच्या विसंगत सहकार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना अभय दिला जातो. कोट्यावधी रुपयांच्या बँक घोटाळ्याप्रकरणी जमिनीवर असलेले आरोपी कपील वाधवन व धिरज वाधवन यांना व त्यांच्या कुटुंबियांच्या तेरा जणांना देशातील आपतकालीन व संचारबंदी कायद्याचे उल्लंघन करून राज्याचे गृहविभागाचे प्रधान सचिव अमिताभ गुप्ता यांनी पंचतारांकित आदबी केली. पण गुप्ता विरुद्ध कोणतीच कारवाई झाली नाही. या दोन घटनांबाबत कोणत्याच राजकीय पुढाऱ्यांनी आवाजही उठविला नाही. सरकारच्या या दोन घटनांबाबत परस्पर भूमिकेवरून असे लक्षात येते की, सरकार हे कोरोनाच्या महासंकट प्रसंगीही गांर्भिय घेत नाही.

अलीकडे ऑक्सफॅम्ने एक अहवाल प्रसिद्ध केला होता. यात जगातील व देशातील अब्जाधीशांची नावे व संपत्ती जाहीर केली.

देशातील १ टक्का लोकांकडे ७० टक्के लोकांकडे असलेल्या संपत्तीपेक्षा ४ पटीने जादा संपत्ती असल्याचे म्हटले आहे. ही संपत्ती देशाच्या अर्थसंकल्पांपेक्षा (२०१९) अधिक आहे. ही संपत्ती केवळ १ टक्का उद्योगपतींकडे आहे. उर्वरित उद्योगपती व्यावसायिक, बडे नोकरशाहा, राजकीय नेते व धार्मिक संस्था व इतरांकडे असलेल्या एकंदरीत संपत्तीचा विचार केल्यास किमान पाच वर्ष देशाचा गाडा विनापरदेशी कर्जाविना चालू शकतो. ज्या देशाने या बड्या उद्योगपतींना, व्यावसायिकांना व नेत्यांना संपत्ती व सत्ता दिली तो देश व देशातील बहुसंख्य जनता कोरोना युद्धात होरपळत असताना आमचा देश महात्मा गांधींच्या आदर्शावर चालतो अशी जगात वल्गना करणारी राजकीय मंडळी महात्मा गांधींच्या हिंद स्वराज्य संकल्पनेला किमान संकटकाळी तरी साकार करण्यासाठी श्रीमंत वर्गाच्या संपत्तीला सिलिंग कायदा लागू करणार आहे का? कोरोनाविरुद्धचे महायुद्ध जनता जनतेच्या नेतृत्वाखाली लढत आहे, असे पंतप्रधान म्हणतात. युद्ध संपले नाही. १३० कोटी जनता या युद्धाविरुद्ध लढत आहे. तरीपण युद्ध न जिंकताच या युद्धातील योद्ध्यांना म्हणजेच प्रशासनातील काही घटकावरच (जे की त्यांचे कर्तव्य आहे) अशांवर पुष्पवृष्टी केली जाते. या युद्धात आपले सर्वस्व गमावणारे कोट्यावधी कष्टकरी, कामगार, अन्नाविना हा लढा लढत आहेत. त्यावर पुष्पवृष्टी नव्हे तर किमान भाकरीचा तुकडातरी टाका असा प्रश्न सुज्ञ भारतीय नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे. देश अभूतपूर्व संकटात असताना राष्ट्रहितार्थ देशातील श्रीमंत व्यक्तींच्या संपत्तीवर जमीनदारांप्रमाणे आणलेला सिव्हील ॲक्ट लागू करण्याचे धाडस दाखविले तरच गांधींचा चरखा त्या नेत्यांच्या हातात शोभून दिसेल व देशातील तमाम १३० कोटी जनता त्यांना सलाम करेल.

**जाता.... जाता....**

**देशवासीयांनी राष्ट्रप्रेमाबद्दल याचाही विचार करावा...**

देशातील उद्योगपती, नेते, कलावंत, खेळाडू यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव म्हणून देशातर्फे ज्यांना विविध प्रकारचे पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.

या सर्व व्यक्तींच्या कार्यकर्तृत्त्वात देशाचा व देशातील सर्व नागरिकांचा प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष सहभाग असतो. देश व देशातील बहुसंख्य जनता संकटात असताना या पुरस्कारप्राप्त व्यक्तींकडून देशाला व समाजाला एक अपेक्षा असते. या ठिकाणी आम्ही कोरोना संकटप्रसंगी देशातून आलेल्या व्यक्तींकडून मदतीचा उल्लेख करतो आहोत. जनतेनेच ठरवावे खरे राष्ट्रप्रेमी कोण? व ढोंगी कोण? यासाठी एका सेवानिवृत्त सैनिक अधिकारी मोहिंदर सिंग यांनी स्वयंस्फुर्तीने आपल्या पेन्शन व ग्रॅच्युएटीतून सव्वा पंधरा लाख रुपयांची मदत केली. सिनेअभिनेता अक्षयकुमार यांनी तब्बल २५ कोटी रुपयांची मदत केली.

ज्या कलावंतांना व खेळाडुंना देशातील भारतरत्नाने सन्मानित केले, ज्यांची संपत्ती हजारो कोटींमध्ये आहे ज्यांचे वार्षिक उत्पन्नही हजार कोटींमध्ये आहे, अशा कलावंतांनी व खेळाडुंनी केवळ २५ व ५० लाखांतच आपलं देशासंदर्भात मदत करून प्रेम व्यक्त केले. या व्यक्तींना राष्ट्रपती, पंतप्रधान, न्यायाधीश यांच्याप्रमाणे मोफत प्रवास व देशातील, राज्यातील प्रमुख व्यक्तींचा दर्जा आहे. ज्यांना प्रवास व इतर खर्च शासन अनुज्ञेय आहे, याचा सर्व भारतीयांनी विचार करावा.









१

# लोकशाहीतील स्वातंत्र्याचा उलटा प्रवास..!

भारतीय स्वातंत्र्याचा ७३ वा वर्धापनदिन साजरा करत असताना देशातील जनता जागतिक कोरोनाच्या संकटचा सामना करीत असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलीकडेच आत्मनिर्भरता व नव्या भारताच्या उभारणीची घोषणा केली आहे. तर काही विरोधी राजकीय पक्षांच्या नेत्यांनी व देशातील विचारवंतांनी या देशाला एका नव्या क्रांतीची गरज असल्याचे प्रतिपादन केले आहे.

देशातील या अभूतपूर्व संकटप्रसंगी आपण स्वातंत्र्यदिनाचा वर्धापनदिन साजरा करीत आहोत. भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास व लोकशाही अबाधित ठेवण्यासाठी स्वातंत्र्यानंतर देशातील राजकीय मंडळी व लोकशाहीतील सर्व स्तंभ कसे कुचकामी ठरले त्यामुळे आता भारतीयांना नव्या क्रांतीची बिजे रोवणे दुरापास्त झाल्याचे चित्र सध्या देशात निर्माण झाले असून स्वातंत्र्य लोकशाहीची वाटचाल ही ७३ वर्षानंतर उलट दिशेने होत असल्याचे दिसून येत आहे. फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला स्वातंत्र्य, समता व बंधुत्व ही मूल्ये १८ व्या शतकात दिली. आज २१ व्या शतकात ही मूल्ये प्रस्थापित राजकीय व्यवस्थेने अत्यंत चाणाक्ष पद्धतीने हिरावून घेतली आहेत. लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व ही संकल्पना आता इतिहासात जमा होते की काय, अशी परिस्थिती देश नव्हे तर जगात निर्माण झालेली आहे. औद्योगिक क्रांतीनंतर ब्रिटिशांनी जगभरात आपल्या वसाहती उभारल्या वसाहतीच्या माध्यमातून त्या – त्या देशातील लोकांचे आर्थिक शोषण करून त्यांच्यावर गुलामगिरी लादली होती. जगातील ब्रिटिशांच्या गुलामगिरीत अडकलेला भारत हा एक देश होता. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला ब्रिटीश साम्राज्याच्या गुलामगिरीतून स्वातंत्र्य मिळाले. महात्मा गांधी यांनी स्वातंत्र्याची चळवळ तळागाळात पोहचविल्यामुळे ते शक्य झाले. स्वातंत्र्य चळवळीमध्ये हजारो लोकांनी बलिदान दिले, लाखो लोकांचे संसार उघड्यावर पडले. भारत स्वतंत्र झाला त्यावेळी देशातील केवळ १ टक्का लोकच हे साक्षर होते. त्यामुळे आपण स्वीकारलेल्या लोकशाही शासनव्यवस्थेची मूल्ये भारतीय समाजामध्ये रुजले नव्हते. फक्त इंग्रजी जुलमी सरकार हाकालणे हेच सर्वसामान्य भारतीयांचे लक्ष होते. भारतीय स्वातंत्र्या संदर्भात इतिहासकारामध्ये मतमतांतरे होती. स्वातंत्र्यलढा हा मूठभरासाठी की सर्वसामान्य भारतीयांसाठी याबाबतीत स्वातंत्र्यलढ्यातील नेत्यात, समाजसुधारक व विचारवंतांमध्ये तीव्र मतभेद होते. ते यासाठी की, स्वातंत्र्यानंतर स्वतंत्र भारतात सर्वसामान्यांचे स्थान काय असावे यावरून हे मतभेत होते.

थोर कवी व राष्ट्रगीताचे जनक रविंद्रनाथ टागोर यांनीही काँग्रेसच्या स्वातंत्र्यलढ्याबद्दल एके ठिकाणी भाष्य करताना म्हटले की, ब्रिटिशापासून राजकीय स्वातंत्र्यापेक्षा मला सर्वसामान्यांचे स्वातंत्र्य महत्त्वाचे आहे. राष्ट्रवादाच्या नावाखाली मी जिवंत असेपर्यंत सर्वसामान्यांचे स्वातंत्र्य कधीही चिरडू देणार नाही, अशी त्यांची ठाम भूमिका होती. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही त्यावेळच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीचे वास्तव चित्र लक्षात घेऊन आधी सामाजिक सुधारणा व नंतर राजकीय स्वातंत्र्य ही भूमिका घेतली, पण गांधींच्या झंझावती स्वातंत्र्य चळवळीपुढे हे मुद्दे बाजूला फेकल्या गेले. ब्रिटिशांपासून राजकीय स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सर्व भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये एकवटले असे असले तरी भारतीय समाजातील एक वर्ग हा गांधींच्या स्वातंत्र्यलढ्याच्या विरोधात उभा होता. या वर्गाचे हितसंबंध ब्रिटिश सत्तेच्या प्रशासनातील भारतीय अधिकाऱ्यांशी होते. ब्रिटीश प्रशासनात असलेला हा भारतीय वर्ग स्वातंत्र्याचा लढा चिरडून टाकण्यासाठी कोणतीही कसर ठेवत नव्हता तर दुसरीकडे इंग्रजी सत्ता गेल्यानंतर खऱ्या अर्थाने आपण या देशाचे मालक राहू अशी दुटप्पी भूमिका घेत होता. ब्रिटीश सनदी सेवेत जाणाऱ्या भारतीय अधिकाऱ्यांची मानसिकता ही अर्थप्राप्ती व अधिकार यावर केंद्रित होती. या प्रशासकीय सेवेतील अधिकारी हे ब्रिटिशांना अधिक उत्पन्न (महसूल) कसे मिळेल. तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ते ब्रिटिशांशी कटिबद्ध होते. सर्वसामान्य भारतीय जनतेशी व स्वातंत्र्य चळवळीशी त्यांचे काही घेणे-देणे नव्हते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर दुर्देवाने ब्रिटिशांच्या तालमीत तयार झालेल्या या नोकरशाहीवर विसंबून राहून भारताचा स्वातंत्र्यानंतरचा कारभार सुरू झाला. स्वातंत्र्य चळवळतील नेते हे राष्ट्रप्रेम व त्यागाने प्रेरित होते. त्यांना देशाबद्दल व सर्वसामान्यांबद्दल कळवळ होती.

पण देश चालविण्याचा (प्रशासन) अनुभव नसल्याने देशाशी फितूर झालेल्या व ब्रिटिशांशी प्रामाणिक राहिलेल्या या नोकरशाहीच्या माध्यमातून स्वातंत्र्य भारताचा कारभार सुरू झाला. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या काळातच नैतिकतेच्या धाकाने या नोकरशाहीने बऱ्याच प्रमाणात देशासाठी प्रामाणिक काम केले. देश स्वातंत्र्याच्या वेळेस अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत प्रश्नांबरोबरच साक्षरता, बेरोजगारी, शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान आदी प्रश्न देशासमोर होते. राज्यकर्त्यांनी देशातील समस्या सोडविण्यासाठी जागतिक स्तरातून अर्थसहाय्य, तंत्रज्ञान आयात करून देशास स्वावलंबी केले. स्वातंत्र्याच्या दोन दशकांपर्यंत भूकेचा गंभीर प्रश्न असलेल्या आपल्या देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केले. आज भारत हा अन्नधान्य उत्पादनात जगातील पहिल्या पाच देशांत येतो. स्वातंत्र्यानंतर देशाने अनेक क्षेत्रात प्रगती केली. मूलभूत गरजांच्या बाबतीत देश बऱ्याच प्रमाणात स्वावलंबी झाला. १९५२ ते २०१४ पर्यंत देशातील निवडणुका ह्या वेगवेगळ्या मुद्द्यांवर लढल्या गेल्या. त्यात प्रामुख्याने गरिबी, भष्ट्राचार, विकास व धर्म यांचा समावेश राहिला आहे. स्वातंत्र्यानंतर सर्वाधिक काळ सत्तेत राहिलेल्या काँग्रेस पक्षाला सत्तेवरून दूर करण्यासाठी त्या त्या वेळच्या परिस्थितीच्या अनुषंगाने राजकीय विरोधकांनी विरोध केला. त्याच लोकशाहीव्यवस्थेतील एक स्तंभ असलेल्या प्रसार माध्यमांनी व अन्य संवैधानिक संस्थांनी मोलाची कामगिरी केली. लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये नागरिकांत जागरूकता व त्या अनुषंगाने देशाविषयी असलेली प्रगल्भ जाणिवांची गरज असते. नेहरूंच्या राजकीय अस्थानंतर लोकशाहीचा उत्सव असणाऱ्या निवडणुका ह्या केवळ खैरात वाटणारे समारंभ व जातीय धार्मिकतेचे स्तोम माजवणारे रणांगण ठरल्याने पुढे येणाऱ्या राज्यकर्त्यांनी भ्रष्ट मार्गाचा अवलंब करून ऐनकेन प्रकारे बॅलेट युद्ध जिंकून सत्तेत कायमस्वरूपी राहण्याचा मार्ग अवलंबविला.


त्यामुळे भारतीय लोकशाहीतील स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, राष्ट्रप्रेम हे मुद्दे हद्दपार झाले. सर्वच राजकीय पक्ष, संघटना ह्या निवडणूक जिंकण्यासाठी भांडवलदारांचे मांडलिक बनल्या व सत्ताधारी राजकीय पक्षांनी सत्ता टिकविण्यासाठी नोकरशाहीच्या ओंजळीने देशाचा कारभार सुरू केला. विकासाच्या नावावर जनतेच्या हितासाठी जागतिक बँकेकडून, वित्तसंस्थानकडून व प्रगत राष्ट्रांकडून अब्जावधी रुपयांचे कर्ज काढले. राजकीय नेते, बडे उद्योगपती व उच्च पदस्थ नोकरशाहने संगनमताने विकासाच्या नावावर व कल्याणकारी योजनांच्या नावावर काढलेल्या या कर्जात कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार करून अमाप संपत्ती गोळा केली व देशाच्या संपत्तीची अक्षरश: लयलूट केली. तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी एका ठिकाणी खंत व्यक्त केली की, विकासासाठी केंद्रातून एक रुपया देण्यात आला तर सामान्यांपर्यंत फक्त दहा पैसे पोहचतात हे देशातील भ्रष्टाचाराचे बोलके उदाहरण आहे. देशाची संपत्ती व मालमत्ता म्हणजे राजकीय नेते मंडळी, उद्योगपती व नोकरशाही यांचे लुटीचे आगार ठरले आहे. तर सरकार म्हणजे सर्वसामान्याला फुकटात मूलभूत सुविधा व सवलती देणारे एक केंद्र ठरत असल्याचे दिसून येते. निवडणुकीच्या रणधुमाळीत मताच्या मूल्यांचे गांभिर्य नष्ट झाल्याने मत हे खरेदी–विक्रीचा व्यवहार झाल्याने देशात सध्याचे भीषण चित्र उभे राहिले आहे. २०१४ नंतर लोकशाही शासन व्यवस्थेतील प्रमुख स्तंभ असलेल्या प्रसार माध्यमे, न्यायपालिका व संवैधानिक संस्थानचे कमालीचे अध:पतन झाल्याचे भारतीय स्वातंत्र्याचा ७३ वा वर्धापनदिन साजरा करीत असतांना प्रकर्षाने जाणवते. स्वातंत्र्यावेळी जवळपास ५०० च्या वर संस्थाने अस्तित्वात होती त्यांचे स्वतंत्र अस्तित्व होते. आज कोरोना जागतिक संकटाचे कारण समोर करून केंद्र व राज्य सरकारने आपल्या अधिकाराचे केंद्रीकरण केले. केंद्राच्या व राज्याच्या अधिकारावरून संघर्ष वाढला आहे.

त्यातच केंद्र व राज्य शासनाने नोकरशाहीच्या भरवशावर देशाचा कारभार सोडून दिल्याने भारत हा 'एक देश एक संविधान' असताना आता देशातील प्रत्येक जिल्हा (७३९ जिल्हे) हा एक स्वतंत्र संस्थान असल्याचे चित्र पाहावयास मिळत असून देशातील जिल्ह्यांतील सिमालगत गावात जाण्यासाठी व्हिजा सारख्या परवानग्या लागत आहेत. कोरोना जागतिक महामारीच्या उपाययोजनांसाठी सरकारने घेतलेल्या उपाययोजनेच्या आड मात्र सर्वसामान्य नागरिकांच्या मुलभूत हक्काचे हनन होऊन देश पुन्हा स्वातंत्र्याकडून गुलामगिरीकडे जात असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.













१०

# ... तर कोविडनंतर नव्या जागतिक व्यवस्थेचे

# नेतृत्त्व भारत करेल!

कोरोना विषाणू संसर्गाच्या वैश्विक संकटामुळे मृत्यूच्या भयापोटी मानव जात बंदिस्त झाली. मानवनिर्मित यंत्रही लॉकडाऊन झाले. मानवी विकासाच्या इतिहासात प्रथमच संपूर्ण जगातील मानवजात एकाच वेळेस बंदिस्त होण्याची ही ऐतिहासिक घटना आहे. मानवाने आपल्या सुखासाठी निर्माण केलेले यंत्र,शस्त्र म्यान केले. पृथ्वीतलावर मानवाचेच राज्य आहे.

अशा अविर्भावात वावरणाऱ्या मनुष्य प्राण्यांच्या संचारावरील प्रतिबंधाने पृथ्वीवरील लाखो जीवसृष्टी व पर्यावरणावर सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. लॉकडाऊन कधी संपणार? त्यानंतर जगाचे चित्र कसे असेल हा आता येथे विषय नाही पण मनुष्यप्राण्याच्या हट्टापोटी, सुखासाठी त्यांनी या पृथ्वीतलावरील जीवसृष्टीला ओरबाडून खाल्ले त्या मनुष्यप्राण्याला काही काळ बंदिस्तवासात ठेवल्याने पृथ्वीतलावरील लाखो जीवांची जगण्याची आशा पल्लवित झाली आहे. कोरोनानंतर जग कसे असेल त्यापेक्षा मनुष्याने आपल्या जीवनपद्धतीत अमुलाग्र परिवर्तन न घडवल्यास मानवी समूहास, सृष्टीच्या अस्तित्वास धोका निर्माण होईल.

पृथ्वीच्या उत्पत्तीनंतर निर्माण झालेल्या जीवसृष्टीचा इतिहास अब्जावधी वर्षाचा आहे. मानवाच्या अस्तित्त्वाअगोदर अब्जावधी वर्षापूर्वीपासून सूक्ष्मजीवांचा आदिवास पृथ्वीवर आहे. मानवाची भटकंती अवस्था संपल्यांनतर कृषी संस्कृती उदयास आली त्या माध्यमातून नागरी संस्कृती अस्तित्त्वात आली. स्थिरावलेल्या नागरी संस्कृतीत मानवी जीवन अधिक सुखी व समृद्धी करण्याच्या लोभापोटी मानवाने वन्यजीव व निसर्गाची लूट सुरू केली. कृषी संस्कृती ते आजतागायत मानवी विकासाच्या युगात मानवाने निसर्गाच्या लुटीचे आक्राळविक्राळ रूप धारण केले. मानवाच्या विकासाच्या या कालखंडात एक कोटीपेक्षा अधिक पशु, प्राणी, पक्ष्यांच्या प्रजाती मनुष्यानी नष्ट केल्या. साठ ते सत्तर टक्के जंगल नष्ट केले भूगर्भातील खनिज संपत्ती, खनिज तेल व जलसंपत्तीसाठी पृथ्वीच्या पोटातील कोथळा काढला. समुद्रकिनारी असलेल्या उद्योग कारखान्यांनी शेकडो किलोमीटरचा समुद्र किनारा प्रदूषित केला. वाढते कारखाने, हवाई जल व स्थल वाहतूक तसेच शेतीतील रासायनिक खते व कीटकनाशकाच्या वापरामुळे जमीन पाणी व वातावरण कमालीचे प्रदूषित झाले. पृथ्वीच्या वातावरणातील ओझोन थराला तडे गेलेत. यामुळे तापमानात वाढ झाली व हवामान बदलाने पृथ्वीवरील ऋतुचक्र बदलू लागले.

१९९० च्या दशकात तापमान वाढीने जगावर होणाऱ्या दुष्परिणामावर जगभरात तज्ज्ञांची चर्चा घडून आणली. प्रोसेसिंग ऑफ नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्सेस पियर रियुज या संस्थेने यासंदर्भात दिलेल्या अहवालात हवामान बदलामुळे संभाव्य धोक्याची भीषणता दर्शविली आहे. अलीकडील दशकात विकासाच्या नावावर चाललेल्या वन्यजीवांचे भीषण उच्चाटन म्हणजे पृथ्वीच्या इतिहासातील पुरावे नामशेष होण्याची क्रूर कर्म चालू आहे, आणि पूर्वीपेक्षा ते अधिक भीषण आहे. वन्यजीवांची मोठ्या प्रमाणात होणारी कत्तल हे मानवाने स्वत:च्या पायावर टाकलेला धोंडा असून ही कृती सृष्टीचा नाश ओढवणारी कृती आहे. जगभरातील संशोधक व संस्थेने यासंदर्भात धोक्याचा इशारा दिला आहे. जागतिक पातळीवर या विषयावर गांभीर्याने चिंतन सुरू केले आहे.

**पॅरिस करार...**

सन २०१६ मध्ये १९५ देशांनी पॅरिस करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यूएनएफसीसीसी कराराचा सारांश असा – पृथ्वीवरील वाढते तापमान त्या अनुषंगाने हवामान बदलाचे गंभीर दुष्परिणाम दिसून येत आहे. हवामान बदल हा जास्त धोका आहे. त्यामुळे हे संकट जागतिककृतीमुळेच रोखल्या जाऊ शकते आणि पॅरिस करारामुळे आम्हाला (सर्व देशांना) तसे करण्याचा मार्ग मिळतो. या संकटाला केवळ राष्ट्रीय सरकारे तोंड देऊ शकत नाही. त्यामुळे त्या देशातील प्रांतिक, राज्य सरकारे, उद्य–ोजक व्यापारी, गुंतवणूकदार, नागरी संघटना, शैक्षणिक संस्था, विद्यापीठे यांच्या भूमिकेलाही प्राधान्य देण्यात आले. पॅरिस करारात सरकारबरोबरच त्या त्या देशातील संस्था व संघटना यांना प्राधान्य देण्यात आले. सन २०१९ मध्ये अमेरिकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ड्रम्प यांनी पॅरिस करारातून माघार घेलत्यानंतरही अमेरिकेचे राज्य, शहरे, महाविद्यालय व विद्यापीठ सुमारे ३८०० अधिक नेत्यांनी या करारास पाठिंबा दर्शवून कराराच्या वचनबद्धतेसाठी व त्याच्या पूर्ततेसाठी पाठिंबा दिला.

पॅरिस करार हा जागतिक ऐतिहासिक करार असून औद्योगिक, आर्थिक सत्ता, धर्मसत्ता यांनी आपले हितसंबंध दूर ठेवून एकत्रित हवामान बदलाच्या जागतिक संकटाचा सामना करण्यासाठी सज्ज झाले आहे.

**कोरोनानिमित्त – ग्लोबल वार्मिंगला ब्रेक!**

कोरोना संसर्गाच्या निमित्ताने जागतिक टाळेबंदी व मानवी संचारास असलेल्या प्रतिबंधनाने जगातील प्रदूषण ७०–८०% टक्के कमी झाले आहे. कोरोना व्हायरस हा ग्लोबल वार्मिंग संकटासाठी एक देवदूत ठरत आहे.

पृथ्वीदिनानिमित्त लॉकडाऊनचे सकारात्मक परिणामाचे वृत्त झळकले. सर्वाधिक प्रदूषित शहरांची हवा शुद्ध व स्वच्छ झाली. औद्योगिक शहरालगतच्या नद्या व समुद्रकिनारे बऱ्याच प्रमाणात शुद्ध झाली. आपल्या भारताच्या बाबतीत उदाहरण द्यावयास झाले तर गेल्या चार–पाच दशकांपासून गंगा या नदीच्या प्रदूषणाचा विषय चिंतनीय, राजकीय व धार्मिक अस्मितेचा झाला होता. गंगा नदीच्या शुद्धीकरणासाठी आजपर्यंत सुमारे ४० ते ५० हजार कोटी रुपये खर्च झाला आहे. पण गंगेचा एक थेंबही शुद्ध झाला नाही. गंगा नदी मृत्यूशय्येवर उभी होती. परंतु लॉकडाऊनच्या कालखंडात गंगा नदीच्या पाण्यातील ऑक्सिजनच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली व हरिद्वार येथील गंगेचे पाणी पिण्यायोग्य असल्याचा अहवाल जल प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिला आहे. टाळेबंदीच्या कार्यकाळात वन्य जीव प्राण्यांनी मोकळा श्वास घेतला. पुराणाच्या काळात उल्लेख असणाऱ्या दुर्मिळ तक्षक सापाचे दर्शन घडले. प्राणी, पक्षी यांच्या मुक्त संचाराने निसर्गप्रेमीही मोहित झाले. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनी निळे आकाश, आकाशातील चांदणे व मोरांचा निर्भय मुक्त संचार हे आपण तीस–चाळीस वर्षानंतर प्रथम अनुभवतो. हे न्यायाधीशांचे लॉकडाऊनच्या सकारात्मक परिणामाचे बोलके भाष्य आहे. अमेरिकेच्या समुद्रात लुप्त झालेल्या व्हेल माशाचा मुक्त संचार या काळात पहावयास मिळाला.

**प्राणहानी व वित्तहानीत लक्षणीय घट...**

प्रदूषणामुळे होणाऱ्या आजारांमुळे भारतात दरवर्षी साधारण १२ लाख लोक मृत्युमुखी पडतात. टाळेबंदीमुळे मनुष्याच्या संचारावर प्रतिबंध आल्याने हवेतील प्रदूषण कमी झाले त्यामुळे मानवी आरोग्यात सुधारणा झाली. संसर्ग आजार, रक्तदाब इतर आजारांचे प्रमाण या काळात घटले. किमान एक लाख लोकांचे प्राण वाचले. रस्ते अपघातात भारतात दर मिनिटाला एक मृत्यू होतो. लॉकडाऊन अपघाताचे प्रमाण ९० ते ९५ टक्के कमी झाले. त्यामुळे १२००० पेक्षा अधिक लोकांचे प्राण या कालावधीत वाचले. इतर आजाराचे प्रमाणही घटले व अपघात नगण्य झाल्याने उपचारांसाठी हजारो कोटी रुपये वाचले. वाहनांची रेलचेल थांबल्याने अनावश्यक इंधनाची उधळपट्टी थांबली, त्यामुळे हजारो कोटी रुपयांचे परदेशी चलन वाचले. समाजातील व्यसनाधीनता कमी झाली त्यातून पैशाची बचत झाली.

**भ.महावीर, भ.गौतम बुद्ध व महात्मा गांधी यांच्या विचारांची गरज...**

सुमारे अडीच हजार वर्षांपूर्वी भगवान महावीरांनी मानवाची सत्ता, संपत्ती, लालसा व विलासी जीवन पद्धतीने निसर्गाची हानी होऊन संपूर्ण जीवसृष्टीला धोका निर्माण होईल हे लक्षात आणून दिले होते. त्यामुळे त्यांनी राजसत्तेचा त्याग करून भारतीय समाजाला निसर्गपूरक जीवन जगण्याचा मार्ग दाखविला. भगवान महावीरांच्या ५ तत्त्वांमध्ये अहिंसा हे तत्व अतिमहत्त्वाचे आहे. मनुष्याला नव्हे तर पृथ्वीवरील सर्व सूक्ष्म जीव, प्राणी, वनस्पती यांना जीवन जगण्याचा अधिकार आहे. सृष्टीतील इतर जीव जगले तर मनुष्य जगेल. मनुष्याला बुद्धी असल्याने तो या सृष्टीचा विश्वस्त आहे. मनुष्याचे वर्तन हे विश्वस्ताप्रमाणे असावे असे महान तत्त्वज्ञान भगवान महावीर यांनी मांडले. त्यानंतर म. गौतम बुद्धाने पण निसर्गनियम शिकवून त्याचे अनुकरण करण्यास सांगितले. आधुनिक भारताच्या इतिहासात महात्मा गांधींनीही यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून निसर्गाच्या शोषणाचे भविष्यात होणारे दुष्परिणाम ओळखले होते.

प्रत्येक व्यक्तीला स्वावलंबनाचा व मर्यादित गरजांचा कानमंत्र दिला. पारंपरिक कृषी संस्कृतीचा पुरस्कार करून खेड्याकडे चला असा संदेश दिला. भगवान महावीरांच्या अहिंसा या अस्त्राचा वापर करून साम्राज्याचा सूर्य न मावळणाऱ्या इंग्रजी गुलामगिरीतून भारतीयांना मुक्त केले. आज कोरोना या वैश्विक संकटानंतर निर्माण होऊ पाहत असलेल्या नव्या जागतिक व्यवस्थेत भगवान महावीरांच्या व महात्मा गांधी यांनी दाखवलेल्या जीवन पद्धतीला महत्त्व प्राप्त होणार आहे. इतिहासात आपण आपल्या महान संस्कृती व जीवन पद्धतीला ढोंगी, धार्मिक, जातीय व अंधश्रद्धेत जोखडून ठेवले. परिणामी प्राचीन भारतीय जीवन पद्धती अडगळीत पडली.

आज भगवान महावीरांच्या शौर्याप्रमाणे समाजातील श्रीमंत वर्गाने त्यागाची भूमिका घ्यावी. सत्ताधारी राजकीय नेत्यांनी महात्मा गांधींप्रमाणे फकिरी वृत्तीचा अंगीकार करून सत्तेचा वापर मानव व पर्यावरण यांच्या रक्षणासाठी केल्यास कोरोनानंतरच्या नव्या जगाचे नेतृत्त्व निश्चितच भारताकडे असेल.



**कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी जगभरात लॉकडाऊन करण्यात आले. त्याचे काही चांगले व वाईट परिणाम पहावयास मिळत आहेत.**

## चांगले परिणाम...

➪ गेल्या काही दिवसांपासून लॉकडाऊनमुळे जीवनावश्यक वस्तुसंदर्भाचे कारखाने व वाहतूक बंद असल्याने प्रदूषणात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे.

➪ कारखाने बंद असल्याने कारखान्यातून निघणाऱ्या विषारी द्रव्य समुद्रात व पाण्यात मिसळणे बंद झाल्याने पाणी स्वच्छ होत आहे.

➪ पेट्रोल व डिझेलचा खप कमी झाल्याने डिझेल व पेट्रोलची आयात कमी झाल्याने मोठ्या प्रमाणात विदेशी चलन वाचत आहे.

➪ कुटुंबासाठी एकत्र राहण्याची संधी मिळाल्याने ताणतणाव कमी झाला व आरोग्यात सुधारणा झाली आहे.

➪ दारू, तंबाखू, गुटखा, सिगारेटच्या व्यसनाधिनतेच्या प्रमाणातही मोठी घट झाल्याचे समोर आले आहे.

➪ गुन्हेगारीच्या संख्येतही घट झाली आहे.

➪ रस्ते अपघाताच्या प्रमाणाची संख्याही मोठ्या प्रमाणात घटली आहे.

➪ अनावश्यक पैशाची उधळण व वाईट प्रवृत्तीला चाप बसला आहे.

➪ मनुष्याची सर्वत्र वर्दळ कमी झाल्याने प्राणी, पशु, पक्षी यांचा निसर्गात मुक्त संचार होत आहे.

# वाईट परिणाम...

- कोरोना विषाणूसंदर्भात समाजात प्रचंड भय निर्माण झाल्याने बाहेरगावाहून आपल्या मूळ गावी येणाऱ्या व्यक्तीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या आपले भाऊ व नातेवाईक यांनाच आपल्या गावात प्रवेश बंदीचा सामना करावा लागत आहे.

- शहरात गल्लोगल्लीत प्रवेश बंदीचे फलक लावल्याने संकुचित प्रवृत्ती बळावत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

- लॉकडाऊनमुळे मोठ्या प्रमाणात बेरोजगारीचा प्रश्न निर्माण झाला आहे.

- रोज काम करून पोट भरणाऱ्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येत आहे.

- स्थलांतरित लोकांचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे.

- प्रशासनाला विशेष अधिकार दिल्याने दंडेलशाही वाढली आहे.

- सतत खाजगी वाहिन्यांवर कोरोनाशिवाय कोणतेच वृत्त नसल्याने काही प्रमाणात या रोगाच्या भीतीने मनोरुणांची संख्या वाढण्याची शक्यता बळावली आहे.





**कोरोना संसर्ग :**

# शौर्याचे प्रतीक व या रोगाचे सेलिब्रीटी

असंसर्गजन्य व संसर्गजन्य रोगाचा इतिहास पाहता कोणत्याही रोगास इतकी प्रसिद्धी मिळाली नव्हती जितकी प्रसिद्धी कोविड-१९ रोगास मिळाली आहे. रोग होणे समाजात अनारोग्याचे प्रतीक असताना कोविड-१९ झालेल्या रुग्णास 'योद्धा' या शौर्यात्मक प्रतिकाने नावाजले जाते व या कामासाठी देशातील राजकीय, अभिनय क्षेत्रातील नट-नटी यांच्यामार्फत या रोगाचा आभासी प्रचार करण्यात येतो हे ऐतिहासिकच म्हणावे लागेल. लसीचा इतिहास पहिला असता तिचे संशोधन, तिचा रोग्याला होणारा लाभ, तिचे दुष्परिणाम, कळण्यासाठी काही वर्षे लागतात, पण कोविड-१९ या रोगाचा ९ महिन्यातच वाढणारा संसर्ग, त्याचे निदान, त्यामुळे होणारे मृत्यू, उपचार व प्रतिबंधक लस तयार करण्यासाठीची जगात लागलेली स्पर्धा हे सर्व पाहताना जनसामान्यात कमालीचा गोंधळ व स्वतःच्या आरोग्य बाबत चिंता व्यक्त होते आहे.

# भय इथले संपत नाही...!





कोरोना लसीच्या संदर्भात डिसेंबर २०२० मध्ये आलेल्या वृत्ताचे अवलोकन केले असता ही लस मानवी जीवनास तारक की मारक याविषयी सर्वसामान्यांच्या मनात प्रचंड संभ्रम आहे. जगातील महासत्ता अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे लस घेण्यास इच्छुक नाहीत. तर सध्याचे राष्ट्राध्यक्ष बायडन यांनी जाहीरपणे लस घेतली. ब्रिटनस्थित ४५ टक्के आशियाई लोक लस घेण्यास इच्छुक नाहीत. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य कंपनीचे महाव्यवस्थापक बिल गेट्स यांनी पाच वर्षापूर्वी एखाद्या गंभीर संसर्ग रोगाचे भाकीत केले होते. आता त्यांनी पुढील चार ते पाच महिन्यात हा कोरोना अजूनही उग्र रूप धारण करील अशी भिती व्यक्त केली. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यक्ती आरोग्य क्षेत्रासंबंधी कसे भाष्य करू शकतो व त्याच अनुषंगाने या लस निर्मितीसाठी आर्थिक सहाय्य करतो हे संशयास्पद वाटते. करोना संसर्ग व लसीच्या संदर्भात जगात वेगवेगळे तर्क लढवले जात असताना. ही लस घेतल्याने एड्स व इतर गंभीर आजार होण्याची भिती वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ व संस्थांनी व्यक्त केली आहे. दक्षिण आफ्रिकेच्या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशानी ही लस सैतानाने तयार केली आहे असे वक्तव्य केले आहे. ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष जाईर बोल्सोनारो यांनी लस फसली तर मानव हा अतिमानव किंवा स्त्री-पुरुषाची लक्षणे परस्परात बदलू शकतील असे म्हटले आहे. तसेच लस न घेणाऱ्यास सार्वजनिक ठिकाणी संचारास प्रतिबंध असेल अशी सूचना तेथील सर्वोच्च न्यायालयाने केली आहे. यात अजून भर म्हणजे करोणाच्या दुसऱ्या, तिसऱ्या व अन्य विषाणू संसर्गाच्या बातम्या अत्यंत चाणाक्षपणे पसरविण्यात येत आहेत. पूर्वी अशाच बातम्या दहशतवादाच्या संदर्भात जगभरात पेरण्यात येत होत्या. आता दहशतवादाची जागा कोरोना विषाणूने घेतली आहे. आज जग एका काल्पनिक भयानक शत्रूच्या छायेखाली दिवस काढत आहे. इथे प्रत्येक क्षणाला वाटते की.... भय इथले संपत नाही...!



संजय टाकळगव्हाणकर हे सामाजिक, राजकीय, घडामोडीचे अभ्यासक असून, त्यांनी महाविद्यालयीन जीवनापासून मराठवाड्यातील अनेक दैनिकांसाठी लिखान केले आहे. सन १९९३- ९५ या काळात दै.लोकपत्रचे उपसंपादक होते. सध्या ते मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी, मराठवाड्यातील अनुदानित शाळेतील शिक्षकांच्या हक्कासाठी, संस्थाचालकांनी चालविलेल्या शिक्षकांच्या आर्थिक शोषणाविरूद्ध त्यांनी उभारलेला लढा मराठवाड्यात सुपरिचित आहे. तसेच शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या शिक्षणविरोधी प्रवृत्ती विरूद्ध त्यांनी उच्च न्यायालयात अर्ध शतकापेक्षा जास्त याचिका दाखल केल्या. 'लढा शिक्षणाच्या हक्कासाठी' ही चळवळ पुढे नेताना त्यांच्यावर अनेक फौजदारी खटले दाखल असणारे महाराष्ट्रातील ते एकमेव मुख्याध्यापक असावेत. अनुदानित संस्थेत सन १९८० ते २००० या काळातील शिक्षण क्षेत्रातील वाढत्या अपप्रवृत्ती संदर्भात त्यांनी 'शिक्षण विकासापासून गुन्हेगारीकडे' हा विशेषांक प्रसिद्ध केला आहे.



कोरोनाच्या निमित्ताने गेल्या काही दिवसात तुम्ही लिहिलेल्या लेखांच संकलन वाचलं.
थोरामोठ्यांनी त्यांच वास्तव कौतुकही केलं आहे.
निमित्त कोरोनाचं असलं तरी तुम्ही इतिहासाचाही धांडोळा घेतला आहे.
सामान्यांच्या बाजूनं उभी राहण्याची तुमची परंपरा घरंदाज आहे.
आई वडिलांकडून दोन्ही कुळात देशसेवा आणि समाजसेवा करणारे पूर्वज होऊन गेले.
त्या रक्ताला जागून तुम्ही सतत जागे आणि संघर्षरत असता.
जे पटलं नाही त्याला विरोध आणि जे पटलं त्याचं जोरदार समर्थन तुम्ही आयुष्यभर करत आलात.
या पुस्तकातही तुम्ही वर्तमान प्रश्नाचा सखोल धांडोळा घेतला आहे.
कोरोनाच्या सर्व बाजू समजून घेऊन वेगळी मांडणी केली आहे.
ती मला खूप आवडली.त्यामुळं माझ्या ज्ञानात भर पडली.

तुमचा,
इंद्रजित भालेराव

पवन प्रकाशन, परभणी

